# प्रकरण पाचवे

## मांडे खोऱ्यातील सामाजिक आणि धार्मिक जीवनातील काही पैलू

# ::*:: प्रकरण चौथे ::*::

## ** माटे यांच्या सामाजिक आणि वाङ्मयीन कर्तृत्वाचे काही पैलू **

### अस्पृश्यता निवारणाचे स्वरूप :

कोणत्याही आत्मचरित्रात लेखक आपण जीवनात केलेल्या महत्वपूर्ण कार्याचा आढावा घेत असतो. कारण ते कार्य हाच त्या लेखकाच्या जीवनाचा केंद्रबिंदू असतो. कृतकार्याबद्दल समाधान किंवा निराशा लेखकाच्या मनात असू शकते. आपण यशस्वी झालो की नाही याबद्दलची त्याला चिकित्सा करायची असते. ही चर्चा, चिकित्सा स्वत:च्या आनंदासाठी केवळ असत नाही. आपल्या वाचकांना – जगाला आपल्या कार्याबद्दल यथातथ्य माहिती व्हावी आणि त्या माहितीच्या आधाराने आपल्या कर्तृत्वाचे जगाने मूल्यमापन करावे ही इच्छा आत्मकथनकाराच्या मनात प्रामुख्याने असते.

श्री.माटे यांच्या आत्मकथनात त्यांनी जी विविध कार्ये केली त्याची माहिती आलेली आहे. शिक्षक म्हणून, लेखक म्हणून, "वसंत व्याख्यानमाला" आणि "महाराष्ट्र साहित्य परिषद" या संस्थांचा महत्वाचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी जे जे केले त्याची ओळख या आत्मकथनातून होते. पण माट्यांच्या व्यक्तित्वाचा एक सर्वात अधिक लक्षणीय पैलू म्हणून त्यांच्या सामाजिक प्रबोधनाचा व अस्पृष्टांच्या संदर्भात त्यांनी सेवाबुध्दीने आणि सामाजिक न्यायदृष्टीने केलेल्या कार्याचा उल्लेख होतो. समाजसुधारक माटे हे माट्यांचे बिरुद अभिमानास्पद आहे. स्वत: त्यांना देखील आपल्या या कार्याचा अभिमान वाटतो.

"चित्रपट" या पुस्तकातील १५ वे चित्र [प्रकरण] "माझे अस्पृश्यता निवारण" या शीर्षकाचे आहे. स्पर्शास्पर्श संबंधात समाजामध्ये कशा अतिरेकी कल्पना रूढ होत्या हे या प्रकरणांत

माट्यांनी स्पष्ट केले आहे. आता काळ पुष्कळच बदलला आहे. जुन्यापुराण्या धर्मकल्पना अजून कोठेकोठे क्वचित दिसून येत असल्या तरी त्या कल्पनांचे व रीतिरिवाजांचे कोणी समर्थन करीत नाही. कालबाह्य झालेले संकेत कालोघा बरोबर वाहून गेले. आधुनिक विद्येमुळे उदारमतवाद आणि सामाजिक न्यायबुध्दी यांचा प्रसार होऊन जुन्या रूढींचे जवळजवळ उच्चाटन झालेले दिसते. पण माट्यांनी या प्रकरणात त्यावेळच्या परिस्थितीची जी माहिती दिली आहे ती वाचून आजच्या पिढीतील तरुणांना धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. "चित्रपट" हे आत्मचरित्र तत्कालीन महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय इतिहासावर प्रकाश टाकणारे आहे. "सोवळ्याचे बारकावे" या उपशीर्षकाखाली लिहिलेला मजकूर आज वाचताना खोदही वाटतो. माटे लिहितात,

"पूर्वी विटाळाचे बंड तर फार असे. पूर्वास्पृश्य लोक हे तर अस्पृष्ट होतेच होते. पण अन्नोदक व्यवहारांत ब्राह्मणेतरांचा स्पर्श ब्राह्मणाला चालत नसे. ही विटाळाची भावना ब्राह्मणेतर जातीतही सर्वत्र खोल होती आणि पाण्या-उदकांत तर विटाळाचे इतके पर्याय होते की, ह्या जातीचे त्या जातीला चालायचे नाही, आणि त्या जातीचे ह्या जातीला चालायचे नाही, असे कितीतरी कप्पे समाजांत असत. बाह्मण समाजात तर ही विटाळाची कल्पना अनेक त-हांनी अवतरलेली असे. पारोश्याने ताज्या पाण्याला शिवता येत नसे. खरकटा हात असतां पाण्याच्या मूळ सांठयाला स्पर्श करता येत नसे. सोळे नेसून जेवायला बसले असतांना जर कोणा ओल्ह्या माणसाचा स्पर्श झाला, तर पानावरून उठावे लागे; रात्रीचे पाणी सकाळच्या स्वयंपाकाला चालत नसे; सोवळ्याने चालताना कापसाच्या सुतावरही

पाय पडला, तर विटाळ होत असे; शौचविधि करून आलेला माणूस हातपाय धुवून शुध्द होईपर्यंत अर्थातच अस्पृष्य असे; वपन केलेल्या विधवा स्त्रियांचे सोवळे तर फारच कडक असे; अगोदर समाजात सकेशा विधवा स्त्रिया नसत; पण एखादी असली, तर तिचा स्पर्श स्वयंपाकाला किंवा देवपुजेत चालत नसे; लोणचे, पापड इत्यादिकांचे सोवळे तर विलक्षणच जालीम असे; आणि धाबळी परिधान करूनच यांच्या बरण्यांना किंवा भांडयांना स्पर्श करता येत असे. कापसाचे धूतवस्त्र सोवळे म्हणून चालत असे; पण ते एकदा कंबरेचे सुटले, म्हणजे ओवळे होत असे. मुकटा - तागाचा म्हणा, रेशमाचा म्हणा - हा सदैव सोवळाच राही. धोतर लावून धोऊन स्त्रियांना अब्राह्मणांना स्पर्श करता येत असे, पण लुगडे नेसून तो केला, तर लुगडयाला विटाळ होई, माणसाला नव्हे."[१]

या चमत्कारिक व अत्यंत कर्मठ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अस्पृश्यता निवारणाचे कार्य माट्यांना करायचे होते. त्यामुळे ते फार कठीण होते. ज्याला आपण हिंदू समाज म्हणतो, त्या समाजात शेकडो वर्षे जातीपातीच्या व संप्रदायाच्या कुळ आणि वर्ण यांच्या लहान मोठया भिंती उभ्या आहेत. सवर्ण हिंदूत सुध्दा नाना प्रकारच्या उपजाती आणि पोटजाती आहेत. त्यांच्यात परस्पर संवाद होणे त्यामुळे शक्य नव्हते. ही सवर्ण हिंदूची अवस्था लक्षात घेतल्यावर जे परंपरागत विषमतेमुळे गावकुसाबाहेर फेकले गेले. या अस्पृष्टांची स्थिती काय असेल हे सांगणे देखील अवघड आहे. माट्यांनी म्हटले आहे.

"महार, मांग, चांभार, ढोर अशांसारख्या जाती अस्पृश्य असत; व अजूनही त्या पूर्ण स्पृश्य झाल्या आहेत. असे मानता येत नाही. ह्या जातीची अस्पृश्यता काढावी, असा आमचा हेतु होता.

पण असला एकादा हेतु धारण करणाऱ्या माणसाला आधीच्या कोणकोणत्या कल्पनांच्या गुंत्यातून बाहेर पडावे लागते हे वाचकांच्या ध्यानांत यावे, म्हणून विटाळाच्या कल्पनेचा थोडासा विस्तार वर केलेला आहे."[२] "या साऱ्या कल्पना ज्या समाजात भक्कम बसलेल्या असतात त्यातून जर एखादा सुधारक पुढे आला, किंवा निदान ज्याच्या घरात या कल्पनांचा अंमल जारी असतो. त्यांतून जर तो अस्पृश्यता निवारणाचा हेतु धरून निघाला, तर त्याला दरवेळी बारीक बारीक आचके बसणार, हे उघड आहे. नाही नाही म्हंटले, तरी मूळचे संस्कार झाडून टाकणे अगदी सोपेच असते, असे नाही. माझी स्वत:ची गोष्ट अशीच झालेली होती. मी लहानपणी त्यांतल्या त्यांत मागासलेल्या टापूत राहिलेला अन वाढलेला; व माझ्या घरांतही ह्या कल्पनांचा कडक अंमल चालू असलेला; अर्थात्‌ ह्या कल्पना जिंकावयास मला थोडी थोडी किंमत द्यावी लागली असेल, हे उघड आहे."[३]

माट्यांच्या या निवेदनात प्रांजळपणा आहे. माटे मुळातच तथाकथित उच्चवर्णीय ब्राह्मण घरात जन्मलेले. घरात आणि समाजात सनातन आचार-विचारांची छाप पडलेली होती. आपल्या मनावर या वातावरणाचा जो परिणाम झाला असेल तो पुसून टाकताना माट्यांना मानसिक कष्ट झाले असतील, घरातून आणि समाजातून त्यावेळी त्यांना पूर्ण सहकार्य बहुधा मिळालेले नसेल. पण माट्यांच्या पिंडावर समतावादी विचारांचे काही दृढ संस्कार झालेले होते. जेंव्हा एखादा ज्ञानवंत आपल्या विवेकबुध्दीला, अनुसरून वागण्याची इच्छा करतो तेंव्हा तो भेदभावनेला महत्व देत नाही. माट्यांच्या मनावर टिळक गांधींचे वैचारिक संस्कार झालेले होते.

स्वत: माटे विज्ञानदृष्टीचे पुरस्कर्ते असल्यामुळे, सामाजिक न्याय आणि समता यांचे वास्तविक महत्व त्यांना पटलेले होते. त्यांचे मन दृढनिश्चयी होते. हे काम आपण विरोध पत्करुन सुध्दा करायचे हा त्यांचा निर्धार होता. त्यामुळेच विरोधाला तोंड देत देत अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला त्यांनी चांगली गती प्राप्त करुन दिली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे सर्व कार्य आपल्या स्वत:च्या पायावर उभे राहून माटे करीत असत. कोणी त्यांना "महार माटे" म्हटले अथवा त्यांचा उपहास केला, निरनिराळ्या पध्दतीने विरोध केला तरी त्यांनी आपला विचार सोडून दिला नाही. रचनात्मक विचारांचा जेव्हा लोक विपर्यास करतात तेव्हा तो विचार मध्येच स्थगित होण्याचा धोका असतो. पण सनातन्यांचा विरोध पत्करुन याबाबतीत माट्यांनी जी साहसी पावले टाकली ती महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासात सन्मानपूर्वक उल्लेखावी लागतील.

माट्यांचे म्हणणे असे की,
"अस्पृष्ट लोकांनासुध्दा आपल्या सामर्थ्याच्या बळावर नशीब काढता येण्यासारखे असते. पण हे नशीब काढण्याची संधीच त्यांना मिळत नाही. सामाजिक आडकाठी आणि धार्मिक निर्बंध त्यांच्या आड येतात. त्यांच्या मनांत आणि बुध्दीत सामर्थ्याची बीजे खाचित असतात. पण त्या बीजांच्या वाढीला आणि पोसलेल्या सामर्थ्याच्या वापराला त्यांना संधीच मिळत नाही. अस्पृष्टांचे हिंदु समाजांत व धर्मात जे खरे नुकसान झाले आहे ते हे आहे."[४] पुढे म्हणतात,

"घरच्या अनुभवावरुन मला दुस-याच्या परिस्थितीचा बरोबर बोध झालेला होता; आणि म्हणून अस्पृष्ट लोकांची नैसर्गिक शक्ती वाढीस लावणे, आणि त्यांच्या वाढलेल्या शक्तीचा वापर होऊ देणे, ह्यासाठी समाजाने व धर्माने संधि दिली पाहिजे,

असा आग्रह माझ्या मनांत उत्पन्न झाला; आणि म्हणूनच मी ह्या कामाला प्रवृत्त झालो. प्रत्येक त-हेच्या विचारांत व आचारांत तुमचा गुरू कोण ? तुम्ही या कामांत कसे पडलात, हे विचार तुम्हांला कोठून आले ? असे प्रश्न ज्या त्या माणसाला विचारण्याची वहिवाट असते. पण वहिवाट असली, तरी प्रत्येक माणसाला गुरू करावाच लागतो असे नाही. आपल्या भोवती काय चालले आहे हे जर आपण पहात असलो, आणि आपल्या हातून कांही व्हावे अशी मनाला वासना असली, तर कांही ना काही विचारांची जुळणी बनत जाते; व माणूस उठून कामाला लागतो."[५]

१९१७ पासून माटे यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला सुरूवात केली. त्यांच्या अस्पृश्यतेचे निवारण व्हावे म्हणून त्यांच्यात प्रथम शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे, आपल्या प्रश्नांची तीव्र जाणीव त्यांना व्हावी यासाठी आपले अज्ञान निपटून काढण्याची प्रेरणा त्यांच्या ठायी उत्पन्न केली पाहिजे, आजुबाजूच्या जगाचीही थोडी फार जाण आल्याशिवाय त्यांना आपले हिताहित कळणार नाही, हा विचार माटे यांनी केला. खरे तर या कालखंडात माटे यांच्यासारखा सुशिक्षित की जो टिळक आणि परांजपे यांच्या संस्कारातून घडलेला आहे, तो राजकारणाकडे वळला असता. सर्व सामाजिक प्रश्न राजकीय सत्ता हाती आल्यानंतर सुटतील असे त्याकाळी दृढ मत बनले होते. त्यामुळे राजकारणाच्या क्षेत्रातच महत्वाकांक्षी आणि ज्ञानी मनुष्य उडी घेत होता, पण माटे यांनी मात्र राजकारणाचा मार्ग कधीच स्वीकारला नाही हे विशेष आहे, ते म्हणतात;

"स्वराज्याची चळवळ खूप जोराने चालू झाली. टिळक हे सुरू झालेल्या महायुध्दाचा फायदा घेऊन राजकीय चळवळीत जोराने

पडले; आणि जिकडे तिकडे राजकीय आंदोलनाच्या लाटा जोराने उठू लागल्या. सर्वत्र उल्हासाचे भरते आले; विशेषतः नागपुरापासून बेळगाव-धारवाडपर्यंत अखिल महाराष्ट्र देशांत राजकारणाची ईर्षा खूपच जोराने दिसू लागली. अर्थात सर्व जनता जर राजकारणाच्या मागे जोराने लागली आहे, तर या अस्पृष्टांच्या प्रश्नाकडे कोणीतरी लक्ष पुरविले पाहिजे, असे वाटणे स्वाभाविक होते. देशांतील मोठे लोक हे जर दुसरीकडे व्यापृत आहेत, तर आपल्याला कांही जमते का पहावे, या इच्छेने मी या अस्पृश्यता-निवारणाच्या कामाकडे वळलो."[६] यानंतर माटे आणखी एक कारण सांगतात,

माट्यांच्या मताप्रमाणे "अस्पृश्यता-निवारणाने एक घोर सामाजिक अन्याय दूर व्हावा, हे मत खरेचे होते. राजकारण हे त्याच्या सोडवणूकीवर अवलंबून ठेवणे चूक असेल; पण तो प्रश्न सोडवावयास हवा, हे मत सर्व राजकीय पुढा-यांनी आग्रहाने प्रतिपादले होते. कै.सीतारामपंत देवधर ह्यांनी आम्हाला सामाजिक प्रश्नांच्या विचाराची दीक्षा केंव्हाच दिलेली होती. तुकारामबुवांच्या व ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाच्या वाचनाने या आपद्ग्रस्त समाजाच्या संबंधाने माझ्या मनात गाढ सहानुभूति उत्पन्न झालेली होती; व आईने व माझ्या भावानी भोगलेले हाल माझ्या डोळ्यापुढे सदैव दिसत होते. सर्व राजकीय पुढा-यांचा अस्पृश्यता निवारण्याचा परोक्ष घोष चालू होता. ह्या सर्वांचा परिणाम माझ्या मनावर अतिशय झाला."[७] ह्या वरील अनुभवामुळे माटे अस्पृश्यता निवारणाच्या कामाकडे वळले.

सामाजिक दृष्टया अस्पृश्यतेचे निवारण हे अत्यंत जबाबदारीचे मोठे काम माटे यांच्यासारख्या एका शिक्षकाने स्वीकारुन पुढे वीस वर्षापर्यंत म्हणजे १९३७ पर्यंत ते अत्यंत चिवटपणे चालू ठेवले. यातच त्यांच्या मनाचा खंबीरपणा आणि समाजातल्या खालच्या वर्गातल्या

लोकांविषयी वाटणारा आत्यंतिक जिव्हाळा प्रकट होतो. जवळजवळ ऐंशी वर्षांपूर्वीचा हा काळ आहे. १९१७ मध्ये या कार्याची धुरा त्यांनी खांद्यावर घेतली. त्यावेळी या क्षेत्रात कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचेच काही कार्य होते. म.गांधी आणि डॉ. आंबेडकर हे समाजसुधारक पुढे या क्षेत्रात आले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी रत्नागिरीला पतितपावन मंदिर उभारून आणि सहभोजनाचे कार्यक्रम घडवून अस्पृश्यतेचे निवारण करण्याचे प्रयत्न १९२४ नंतर केले आहेत. १९१७ मध्ये या प्रकारचे कार्य करण्यासाठी समतावादी विचारावर दृढ निष्ठा ठेवणारा कार्यकर्ता सांगायचा तर माटेयांचाच उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल.

आत्मचरित्र वाचताना वाचकांच्या मनात प्रश्न असा उद्भवतो की, ही अवघड वाट यांच्यासारख्या पांढरपेशा माणसाने कशी स्वीकारली ? पुण्यातला त्या काळातला मध्यमवर्गीय असा पांढरपेशा समाज वृत्तीने अत्यंत कर्मठ होता. लोकहितवादी या ब्राह्मण समाजसुधारकाची पुण्यातल्या सनातनी समाजाने सतत निंदा नालस्ती केली होती. मोठमोठया सभा भरवून त्यांच्यावर बहिष्कारही टाकला होता. अशी हकीकत लोकहितवादींच्या चरित्रात वाचायला मिळते. म.फुले या क्रांतीकारकालाही लोकक्षोभाला सतत तोंड दयावे लागले. आगरकरांची अवस्थाही टिळकांच्या काळात अशीच झाली होती. सुधारणावादी विचार मांडण्याबद्दल आगरकर समाजाच्या निंदेचे लक्ष्य बनले होते. एकंदरीत ही पुण्याची परंपरा होती. या परंपरेच्या पार्श्वभूमीवर जुन्या संस्कारात वाढलेला श्रीपाद महादेव माटे नावाचा एक मध्यमवर्गीय समाजाचा घटक असलेला शिक्षक बंडखोरी करून वेगळया वाटेने चालायला लागतो हा चमत्कार आहे. केशवसुतांच्या "नवा शिपाई" या कवितेतल्या काही ओळी येथे आठवतात.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"नव्या जगाचा नव्या मनूचा
शूर शिपाई आहे।
कोण मला वठणीला आणू शकतो
ते मी पाहे।
जिकडे जावे तिकडे
माझी भावंडे दिसताहेत"।

माट्यांच्या ठायी केशवसुतांचा हा नवा शिपाई अवतीर्ण झाला होता असे म्हणता येईल. सुधारणावादी विचारांचा ध्वज त्यांनी सामाजिक न्यायाच्या दृष्टीने हाती घेतला आणि ते वाट चालू लागले.

अस्पृश्यता निवारणाच्या कार्यासाठी हिंदू समाजातून बाहेर पडणे योग्य नव्हे; असा एक विचार या आत्मचरित्रात लेखकाने मांडला आहे. विठ्ठल रामजी शिंदे यांनी ब्राह्म समाजाचा स्वीकार केला होता. ब्राह्म समाज हा हिंदू समाजाला काहीसा दूरचा वाटत होता. याबरोबरच ख्रिस्ती मिशनरीही अस्पृश्यतेचे निवारण करीत होते. पण त्यात ख्रिस्ती धर्माचा प्रचार ब-याच प्रमाणात होता. म्हणून माटे म्हणतात, "अस्पृश्यांचा प्रश्न हाती घ्यावयास हिंदुत्वातून निराळेच व्हावे लागते, अथवा स्वतंत्र व वुसडा असा मतपंथ स्थापावा लागतो असे नाही; समाजाच्या पोटी राहूनही, इतकेच नव्हे तर पोटी राहूनच या प्रश्नाच्या मागे लागले, तर त्याची सोडवणूक अधिक चांगली करता येण्यासारखी आहे, असे विचार समाजात उत्पन्न होणे अगदी स्वाभाविक होते; व तेच आमच्या या प्रयत्नांचा बुडाशी होते."[८]

या कार्याला हात घातल्यानंतर प्रथम माट्यांनी आपल्यापेक्षा ह्या विषयात अनुभवी असलेल्या श्री. विठ्ठल शिंदे यांच्या कार्याची पाहणी केली. त्यांचे मार्ग, त्यांची मते याचे सूक्ष्म अवलोकन केले. परंतु त्यांना त्यांचे मार्ग व तत्वज्ञान आवडले नाही. कारण ते ब्रह्म - समाजाच्या तत्वानुसार कार्य करीत होते. याचे कारण वरील परिच्छेदात आलेलेच आहे.

माट्यांनी आपल्या सर्व सामाजिक सुधारणांत "अस्पृश्यता निवारणा" चा प्रश्न वेगळा काढला. त्याचे मूळ शोधून काढले. या विषयावर बराच अभ्यास केला व मगच कामास आरंभ केला.

विद्यार्थीवर्गात माटे अत्यंत प्रिय होते. विद्यार्थ्यांच्या या प्रेमाचा - सद्भावनांचा आपल्या कामी काही तरी उपयोग करून घेतला पाहिजे असे त्यांना वाटले. ह्या भावनेतूनच त्यांनी विद्यार्थ्यांना घेऊन पुणे शहरातील अस्पृश्य वस्त्यांतून हिंडून आणले. माटे विद्यार्थ्यांना सांगत,

"तुम्ही सुकुमार विचाराच्या सुंदर कविता पुस्तकांत वाचता आणि मी तुम्हाला समजावूनही सांगतो, पण तुम्हाला जिवंत आणि चालते बोलते काव्य जर कोठे प्रत्यक्ष पहावयास हवे असले, तर माझ्याबरोबर अस्पृश्य वस्त्यांत चला, हाल विपत्ति, दैन्य आणि निराशा ह्यांचे मूर्तिमंत अवतार तुम्हाला तेथे पहावयास सापडतील."[१] अशा प्रोत्साहनाने अनेक विद्यार्थी स्वयंसेवक त्यांच्या कार्यात सामील होत असत. विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होवो, अथवा न होवो पण माट्यांना मात्र आपले धार्मिक शिक्षण चालू आहे असे वाटत असे. कै. विठ्ठलराव शिंदे एकदा माट्यांना म्हणाले की,

"ह्या कामाने अस्पृश्यांचा उध्दार किती होईल हे आपल्याला सांगता येत नाही, पण ते करीत राहिल्याने आपला मात्र उध्दार होत असतो."[१०] शिंद्यांचे हे उध्दाराचे मर्म माट्यांना पटले होते.

अगदी प्रथमत: माट्यांच्या मनात देवालय प्रवेशाची बाब उत्पन्न झाली. "आपण जर त्यांना हिंदु म्हणतो, तर आपल्या देवाचे दर्शन त्यांना का घेऊं देऊं नये ? हा प्रश्न त्यांच्या मनाला सतत विचार करायला लावित असे म्हणून त्यांनी आपल्या सहका-यांच्या मदतीने "पतितपावन" [मंदिर]" या नावाचे एक विठ्ठलाचे देवालय बांधावे व तिथे सर्व हिंदुंना प्रवेश ठेवावा असे ठरविले. या कार्याला हात घातल्यानंतर विठ्ठल रामजी शिंदे, लोकमान्य टिळक, बॅ.जयकर, अमळनेरकर महाराज, गोपाळबुवा, गोडबोले बुवा इ.ची भेट घेवून माट्यांनी त्यांच्याशी चर्चा केली. "अस्पृश्याला देवळात घेणे हा मुळात अधर्मच होय."[११] असे वारकरी पंथातल्या वर उल्लेखिलेल्या फडक-यांनी सांगितले. "अंमळनेरकर बुवांनी तर आम्हांस केवळ धुडकावूनच लावले."[१२] या कामाच्या सुरुवातीला त्यांनी सामाजिक मताची पडताळणी केली. तेव्हा त्यांना असे आढळून आले की, आपल्या व समाजाच्या विचारात जमीन आस्मानाचा फरक आहे. जर का आपण हे देऊळ बांधले तर ते "महारांचे देऊळ" होऊन बसेल असे माट्यांच्या मनाने हेरले. शेवटी या प्रश्नाचा नाद त्यांनी सोडून दिला.

'अस्पृश्यांसाठी देवालय असावे.' यालाही मान्यता मिळत नाही असे पाहिल्यावर माट्यांना खेद वाटला. आणि मग "प्रत्यक्ष अस्पृश्यांच्या वस्तीतच जावून काम करावयास लागावे म्हणजे आपल्या

लोकसेवा बुध्दीचा यथायोग्य उपयोग होईल."[१३] असा निश्चय करून माटे यांनी मांगवाड्यात जावून रात्रीची शाळा सुरू केली. ही शाळा उघाड्यावर भरत होती. तिला निवाऱ्याची जागा मिळण्यासाठी पत्र्याची झोपडी घालावयाचे ठरले. पण पत्रे आणण्याची आर्थिक कुवत नव्हती. म्युनिसिपालीटी कडून पत्रे आणि वासे आणून आपले काही विद्यार्थी मदतीला घेवून माटे यांनी झोपडी बांधली. रात्री कंदील घेऊन माटे मांगवाड्यातील शाळेत यायचे. आणि प्रत्येक घरच्या मुलामुलींना हाका मारून ते बरोबर घ्यायचे आणि मग शिकविण्याचे काम सुरू व्हायचे. संस्कार करणे केवढे अवघड होते, हे सांगताना माट्यांनी म्हटले आहे. "तेथे शिकावयास येणारी मुले अत्यंत ओंगळ असत. दारू ही तर त्यांच्या पाचवीलाच पुजलेली. पण समजावून सांगितल्यावर हा प्रकार बंद पडला."[१४] त्यानंतर मंगळवार पेठेत महारवाड्यात दुसरी शाळा सुरू केली. तेथील अध्यापनाचे काम सुरू झाले. "पुणे शहर व लष्कर मिळून आमच्या बावीस शाळा भरत असत."[१५]

माट्यांचा रोजचा दिनक्रम असा - सकाळी उठल्यापासून दहा वाजेपर्यंत अस्पृश्यांच्या तक्रारी ऐकणे, त्याची नोंद करून घेणे, त्यांच्या अडचणी समजावून घेवून त्या सुटण्यासाठी प्रयत्न करणे, दारू सोडावयास लावणे, त्यांना माणसात आणणे, धार्मिक प्रवचन करणे, त्यांच्यात सुधारणेची आवड निर्माण करणे, उच्चवर्णीयांची मानसिकता बदलणे, स्पृश्यांकडून सहानुभूती मिळविणे, या व्यतिरिक्त कोणाचे अर्ज लिहून देणे, आपापसातील भांडणे सोडविणे यात त्यांचा सगळा वेळ जाई. यानंतर भोजन-शाळा. संध्याकाळी शाळा सुटताच खाजगी इंग्जी वर्गाचा क्लास घेत. त्यानंतर जेवण करून रात्री आठच्या

सुमारास माटे व हरिभाऊ फाटक रोज अस्पृश्य वस्तीत चालत जात, व साडे अकराला परत येत. अशा त-हेने ते संपूर्ण दिवस कामात गुंतलेले असत. सुटीच्या दिवशी वेगवेगळ्या जातीच्या परिषदा भरवणे, त्यांच्यात स्वत:च्या हक्काविषयी जागृती निर्माण करणे इ. कामे करीत. या कार्यात त्यांना जवळजवळ शंभर ते सव्वाशे विद्यार्थी मदत करीत असत.

साधारणपणे प्राथमिक शिक्षण देण्याचे काम हे लोक करीत. लिहिता-वाचता येणे, भागाकारापर्यंत गणित येणे येथपर्यंतच अभ्यासक्रम असे. त्यापुढे ही मुले म्युनिसिपालिटीच्या शाळेत जात. एका वर्षी तर माट्यांच्या ह्या छोटया शाळांमधून एकूण ५१ विद्यार्थी नगरपालिकेच्या शाळेत घातले गेले.

माटे म्हणतात, "आपल्या कामाची फलश्रुती काय असे जर कोणी विचारले तर आपण थोडेबहुत तरी गांगरतो अशी माझी कल्पना आहे. तथापि एवढे निश्चयाने म्हणता येण्यासारखे आहे की आपल्या मुला-मुलींना शाळेत घालावे, त्यांना लिहिता वाचता आले पाहिजे ही कल्पना पुणे शहरातील सर्व वस्त्यांत आमच्या या श्रमानेच उत्पन्न होऊन कायम झाली."[१६]

पुणे शहरातील बहुतेक सर्व वस्त्यांत माट्यांनी रात्रीच्या शाळा सुरू केल्या होत्या. नोकरी व इतर कामे करून जितके करता येईल तितके सामाजिक कार्य त्यांनी केले. माट्यांनी आपल्या "अस्पृश्यता निवारणा" च्या कामात सुसूत्रता यावी म्हणून एक "अस्पृश्यता निवारक मंडळ" नावाची संस्था स्थापन केली. त्यांत

अध्यक्ष चिटणीस सहकारी स्वयंसेवक इतकेच त्याचे छोटे स्वरूप होते. या शाळांतून शिकवणारे शिक्षक बाजारी नव्हते; ते ध्येयवादी होते. सामाजिक जाणिवेने भारलेले असल्यामुळे या शाळांतील शिक्षण व्यवस्थित होत असे.

मादयांनी आपल्या आत्मकथनात त्यांनी स्थापलेल्या अस्पृश्यता निवारक मंडळाची माहिती देऊन त्यातील सभासदांची नावेही दिली आहेत. बहुतेक नावे वाचताना जाणवते की, ब्राह्मण समाजातील सुशिक्षित व्यक्ती यात आहेत. याबरोबरच बहुजन समाजातील काही व्यक्ती आणि श्री. पांडुरंगराव व राजभोज जे पुढे लोकसभेचे सदस्य झाले ते दलितांचे नेते यांचे नाव या नामावलीत आहे. या सर्वांचा उल्लेख करताना माटे यांनी म्हटले आहे, "शे सव्वाशे स्वयंसेवकांनी माझ्याबरोबर वर्षानुवर्षे या क्षेत्रात कष्ट केले. हे सारे मिशनरी पध्दतीने काम करणारे होते. कोणाला कसलाही लाभ नव्हता."[१७] ह्या सगळ्या स्वयंसेवकांनी जमेल तेवढे कष्ट केले. यात द्विवेकर, अग्रवाल, नाडकर्णी, शिंदकर, निळकंठराव गोखले, सदाशिवराव गोडबोले, कुशाभाऊ जेजुरीकर, कुलकर्णी, पटवर्धन, कोकजे इ. यांनी मादयांच्या "अस्पृश्यता निवारक" मंडळाची कामे अत्यंत जिवापाड मेहनतीने केली. एक दोन व्यक्तींनी तर आपल्या आवाक्याबाहेर शारिरीक मानसिक त्रास सहन केला. त्या व्यक्ती म्हणजे सेवानिवृत्त पोस्टमास्तर श्री. कुलकर्णी, व डॉक्टर कुशाभाऊ जेजुरीकर होय.

कुलकर्णी हे एका श्रीमंताच्या घरी वाराने जेवत व त्यांच्याच घरासमोरच्या ओसरीवरील दिव्यापुढे अभ्यास करीत. चांभारवाडयांतून काम करून येणाऱ्या ह्या मुलाला घरात घेणे ह्या श्रीमंत माणसाच्या घरातील मंडळींना

कसेसेच वाटे. तेंव्हा त्यांना काही अप्रशस्त वाटू नये म्हणून या माणसाने रोज अंघोळ करून घरी येण्यास सुरूवात केली. असे कित्येक महिने त्यांनी केले. शेवटी शेवटी त्या घरातील बाईलाच त्यांची दया आली व तिने सांगितले की, "तु चांगले काम करीत आहेस, अंघोळ न करता आतां घरांत आलास तरी चालेल."[१८]

दुसरे गृहस्थ म्हणजे कुशाभाऊ जेजुरीकर. हे तर काम करून आल्यानंतर चार महिन्यापर्यंत घराच्या कट्टयावरच झोपत असत. अगदी [थंडीत सुध्दा] शेवटी घरच्या लोकांनाच आपल्या वागण्याची लाज वाटली. माटे सांगतात "समाजाच्या पोटात राहून काम करावयाचे म्हणजे असली तपे करणे भागच पडते."[१९] घरोघरच ह्या लोकांचे कौतुक करावयास हवे. ब्राह्मण घरात जन्मुन सुध्दा ह्या लोकांनी अस्पृश्यता निवारणासाठी जे काही केले त्यास तोड नाही.

स्वत:च्या हाताखाली तयार होणा-या विद्यार्थ्यांच्या मनात अस्पृश्यांसंबंधी आस्था निर्माण व्हावी म्हणून माटे त्यांच्या मनातील भूत-दयेला आवाहन करीत. त्यांची मने सामाजिक दु:खे दूर करण्याच्या विचाराने पेटून उठावीत हा त्यामागचा उद्देश असे. याचे उदाहरण द्यायचे झाल्यास एके वर्षी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दुष्काळ पडलेला असताना, माट्यांनी असेच आपल्या संभाषणांनी व्याख्यानांनी विद्यार्थ्यांच्या भूतदयेला आव्हान करून सुमारे महिनाभर पुरेल इतके अन्न गोळा केले. व पाच वर्षे पुरतील इतके कपडे लोकांना गोळा करून दिले.

यानंतर माट्यांनी पुढे सभा, परिषदा वगैरे भरवण्या व्यतिरिक्त संधी सापडेल तेंव्हा परगावी जाऊन आपल्या कार्याचा प्रसार केला. गावक-यांच्या पुढे अस्पृश्यता निवारणाचे प्रतिपादन करावे,

व रात्री अस्पृश्य वस्तीत सभा भरवून या विषयाची सर्व अंगे समजावून सांगावीत, असा त्यांचा त्रिविध कार्यक्रम दरगांवी ठरलेला असे. पुढे माट्यांनी एकेका प्रश्नासाठी (कलमासाठी) स्वतंत्र मतप्रचार केला. सुरुवातीला "अस्पृश्यांना पाणी द्यावे" या विषयावर भर देऊन त्यांनी ठिकठिकाणी सभा भरवून या विषयाचे महत्व पटवून सांगितले. "साध्या भूतदयेचा अवलंब तरी स्पृश्य समाजाने करावा, असा आग्रह धरला" नंतर "त्यांना देवळात का घ्यावे ?" हे पटवून सांगण्यासाठी असाच प्रचार केला. पण या कामात त्यांना फारसे यश आले नाही. याच संदर्भात माट्यांना एक विचित्र अनुभव आला तो असा की, "आळंदीच्या देवालयात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा" यासाठी त्यांचे प्रयत्न चालू होते. या सुमारास त्यांची भेट एका मराठा पुढाऱ्याबरोबर झाली. ते माट्यांना या संदर्भात म्हणाले की, "देवळात येण्याची स्वारी करून तर पहा, सपाट्याला पन्नास मुडदे पडतील !"[२०] या प्रसंगावरून माट्यांना असे आढळून आले की, हे काम जबरदस्तीने होण्यासारखे नाही. झाले तर ते मतपरिवर्तनानेच साध्य होईल.

माट्यांचा मतपरिवर्तनावर दृढ विश्वास होता. ह्या मुद्दयावरूनच पुढे म.गांधीबरोबर त्यांचे मतभेद झाले. "देवळे उघडा, नाहीतर प्राणान्त उपवास करीन."[२१] असे गांधीनी म्हंटल्यानंतर माट्यांनी त्यांना या संदर्भात पत्र लिहिले. ते असे की,

"महात्माजी, मला जर विचार बरोबर करतां येत असेल, तर विनयबुध्दीने लिहितो की, ही जागृतीची प्रणालि अमुक एका मर्यादे-पर्यंतच जाणारी आहे. म्हणजे ती जेथपर्यंत पोचावयास हवी तेथपर्यंत पोहोचणारी नव्हे. ही प्राणांताची भीति समाजाला आपण घालू नका. याने आधीच भेकड असलेला समाज पुन्हा जास्तच

भोकड होईल. हा नवा विचार कां पत्करावा, याचे आपल्या चित्तांत औदार्याचे जे कोणाचे चलनवलन चालू असेल, ते अज्ञ माणसाच्या मनांत आपण शिरवावे, व अशा रीतीने त्यांची मने कब्जांत घ्यावी. हा एकच उपाय धर्मसुधारणेच्या बाबतीत बलवत्तर आहे; असे मला वाटते. तुमची ही धर्मसुधारणेतील विनिमयपध्दती असावी तितकी उंच दर्जाची नाही, असे म्हणण्याचे साहस मी करतो. सुधारकाने खरी उंची गाठली असे केव्हा म्हणावे ? तर जेव्हा तो आपल्या प्रतिपादनाने श्रोत्यांस आपल्यासारखेच वाटावयास लावील, तेव्हाच, प्रस्तुत प्रश्न धर्ममत बदलण्याचा असल्याने ज्याला सुधारावयाचे, त्याला मृदु हातानेच पुसून कब्जांत घेतले पाहिजे. मरणे खरे, पण ते दहशत घालून नव्हे, तर कष्टत असतांना ते प्राप्त करून घेणे, हा सुधारकांचा खरा पेशा होय. हा पत्करल्यास लोकांना सत्य ज्ञाने प्राप्त होतील, त्यांच्या हृदयांतील ग्रंथी सुटतील, त्यांच्या सर्व संशयाचा छेद होईल.

आपण म्हणत असलेला हा आत्यंतिक इलाज करून पाहीनच, असा आपण आग्रह धरू नये. त्याऐवजी मतपरिवर्तनाची शुध्द व उदात्त भूमिकाच केवळ आपण पत्करावी."२२

या पत्राला गांधीजींनी असे उत्तर दिले की, "तुमची विचारपध्दती मी उमगलो. माझे म्हणणे इतकेच की, कोणास कैचीत धरून वळवावे, या हेतूने मी उपास करीत नाही. "पांगुळलेली" मने चेतनायुक्त व्हावीत, एवढ्याचसाठी तो असतो. याचा कांही लोकांना जाच व्हावा हे दुर्दैवाने खरेच आहे. पण हा जाच फार दिवस टिकतो किंवा सार्वत्रिकच होतो, असे मला म्हणता येत नाही. धर्माची सुधारणा करू पाहणारा लोकांच्या मनावर हुकूमत चालवू पहातो, असे नव्हे, तर तो लोकांना टोसतो, आणि आचारास प्रवृत्त करतो."२३ थोडक्यात मादयांचे म्हणणे असे होते की, देवालय प्रवेशाचे काम

दहशतीने न घडवतां, मतपरिवर्तनपध्दतीने घडवावे. माट्यांनी अस्पृश्यता निवारणाच्या कामी प्रबोधनवादी भूमिका स्वीकारली होती. आपली भूमिका मांडताना ते म्हणतात, "समाजाच्या मनात आपुलकीने प्रवेश केला पाहिजे, त्यांतील राजमार्ग इतरांनी व्यापले आहेत. म्हणून आपण पाऊल वाटेने चालले पाहिजे. लांब लांब वळणं घेतली पाहिजेत नव्या वाटा पाडल्या पाहिजेत. आपले प्रयत्न राजकारण निरपेक्ष असावेत. संधीसमानत्वाचे तत्व स्वीकारून सर्वांना विकासाची संधी दिली पाहिजे."[२४] ही भूमिका त्यांनी पूर्ण विचारान्ती बनवली होती.

आपल्या "अस्पृश्यता निवारणांच्या कार्यास महाराष्ट्रातील शास्त्री पंडितांचे अनुकूल मत असावे अथवा व्हावे ह्या उद्देशाने त्यांनी एकदा पंडित परिषदही भरवली. "पुणे येथे वेदांतवागीश श्रीधरशास्त्री पाठक, महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री अभ्यंकर, फडकेशास्त्री, विष्णुशास्त्री बापट, गोडबोलेशास्त्री इत्यादी सात-आठ निरनिराळ्या शास्त्र्यांकडे जाऊन या विषयाचा उहापोह केला व परिषदेस आपण यावे अशी त्यांस विनंती केली."[२५] पण या मंडळीनी या प्रश्नाबाबतीत अनुकूलता दर्शविली नाही. व काही जण तर सभेलाच आले नाहीत. शेवटी या प्रयत्नातून काही निष्पन्न झाले नाही. पण माट्यांचा हेतू हा की, कुणी मानो या न मानोत "समाजाच्या सर्व स्तरात हा विषय होळता ठेवल्यास ह्या प्रयत्नांचा जरूर उपयोग होतो."[२६] त्यांची बौध्दिक श्रध्दा मोठी प्रबळ होती. त्यांच्या कर्तृत्वावर त्यांचा जबरदस्त आत्मविश्वास होता ते म्हणत, "घो-याने डोंगर उपसायचा असेल तर घो-याच्या एका घावावर देखील श्रध्दा पाहिजे."[२७] असा त्यांचा आग्रह असे.

अस्पृष्ट समाजाचे प्रबोधन शिक्षणाच्या माध्यमातून करण्याचा श्री.माटे यांनी प्रतिकूल परिस्थितीत जो प्रयत्न केला तो खरोखरच स्पृहणीय आहे. नुसताच स्पृहणीय नसून एकसंध हिंदूसमाज निर्माण

SHIVAJI UNIVERSITY (LIBRARY) KOLHAPUR

करण्याच्या चळवळीला तो अत्यंत पोषक आहे. मानवतेच्या दृष्टिकोनातून तो अनुकरणीय आहे. ज्याची जेवढी शक्ती असेल तेवढी त्याने समाज-रचनेच्या कार्यात, दुष्ट रूढींच्या निर्मूलनात, ज्ञानप्रसाराच्या कार्यात लावली, तर निश्चितच परिवर्तनाची पहाट उदयाला येईल. माटे यांच्या दृष्टीसमोर एका अखंड हिंदु समाजाचे स्वप्न होते असे म्हणता येईल. ते क्रांतीकारक नव्हते. पण हळूहळू आणि नेटाने सामाजिक सुधारणा करीत अस्पृष्टांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी धडपडणारे एक विचारशील समाजसुधारक होते. असे या आत्मचरित्रावरून स्पष्ट होते.

हे कार्य करताना या शिक्षकाने त्यागाची पराकाष्ठा केली. शिकवणीच्या क्लासमध्ये मिळणारे मासिक अडीचशे-तीनशे रूपयांची रक्कम सर्वच्या सर्व त्यांनी या कामी लावली. हा त्याग मोठा आहे. दुस-या एखाद्या शिक्षकाने शिकवणुकीतून मिळणा-या पैशावर भौतिक सुखे उपभोगली असती. ते स्वाभाविकही झाले असते. कारण त्या काळातला शिक्षक कनिष्ठ मध्यम वर्गीय असायचा. मिळणा-या तुटपुंज्या वेतनावर तोंड मिळवणी करण्याचा केविलवाणा प्रयत्न तो करायचा आणि निवृत्त झाल्यानंतर तर उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे त्याची अवस्था दयनीय व्हायची म्हणूनच माट्यांनी एक निबंध लिहून या संदर्भातले आपले विचार मांडले होते. निबंधाचे शीर्षक "शिक्षकाने केंव्हा मरावे ?" हे होते. त्यात निवृत्त झाल्या-बरोबर त्याला मृत्यू यावा असे सुचविले होते. अशा त्या कालखंडात आणि परिस्थितीत माटे आपल्या शिकवणीतल्या पैशांचा विनियोग सामाजिक कार्यात करीत होते. आणि त्यातील एकही पैसा त्यांनी वैयक्तिक स्वार्थासाठी किंवा कुटुंबासाठी वापरला नाही. ही खरोखरच आश्चर्यकारक आणि अभिमानास्पद घटना आहे. आपल्या आत्मचरित्रात या संदर्भात माटे यांनी म्हंटले आहे,

"घरात जमा होत असलेला पैसा सारखा बाहेर जातो, हे पाहून एखादया स्त्रीने आमच्या घराचे स्मशानस्थान बनविले असते. पण लक्ष्मीबाईंनी स्मशानस्थान तर बनविले नाहीच, उलट अनेक आपत्तींच्या प्रसंगीसुध्दा आमचे घर म्हणजे त्यांनी "आनंदभुवन" बनविले आहे. आतां जीविताची अशाश्वती वाटू लागली असतां, खरे बोलले तर कोणी आत्मस्तुतीचा दोष देणार नाही अशा समजुतीने सांगतो की, माझ्या कमाईतील पंधरा हजार रुपये मी अस्पृष्टांच्या कामांत खर्च केले आहेत; आणि हे सारे लक्ष्मीबाईंनी खुल्या मनाने आणि बिनतक्रार मला करू दिले, हे माझ्यावर त्यांचे केवढे उपकार आहेत."[२८]

पुण्यातील सनातनी कर्मठ समाजाने या कार्याबद्दल माट्यांची शक्य तितकी निंदा नालस्ती केली. "महार माटे" हे तर त्यांचे संबोधन लोकप्रसिध्द झाले होते. पण त्यांची निंदा यापेक्षा किळसवाण्या पध्दतीने करण्यात येत होती. कोणी म्हणत असे, "भोपटकर आणि माटे हे रोज महारांच्या घरून गोमांस खाऊन येतात." तर कोणी "एक वाया गेलेला माणूस" म्हणत. तर एक भागवद्भक्त सनातनी मराठे आपल्या अनुयायांना सांगत, "हरिभाऊ फाटक आणि माटे हे मांगिणीशी व्यभिचारासाठी मांगवाड्यात रात्रीचे जातात."[२९] एका सनातनी ब्राह्मणाने तर अगदी त्यांच्यासमोर म्हंटले की, "तुम्ही हे काम करता, तर तुमच्या बीजांत काही तरी भेसळ असली पाहिजे."[३०] या प्रकारची अभद्र निंदा विरोधकांनी चालवली होती.

कोणतेही सामाजिक कार्य करताना जुनाट विचारांची माणसे सर्व प्रकारचा विरोध करतात. कारण त्यांना नवी विचारसरणी धर्मविघातक आणि संस्कृतिविध्वंसक वाटत असते. जुनाट विचारांच्या अंधाऱ्या वातावरणात दीर्घकाळ राहिलेल्या लोकांना नवविचारांची

तिडीक सहन होत नाही. त्यांच्या दृष्टीने जुनी परिपाठी सोडू नयेत आणि नव्या विचारांची कास कधी धरू नये. आपले पूर्वज ज्या चाकोरीतून चालत होते त्याच चाकोरीतून आपल्यालाही चालावे लागेल. जुन्याचा अभिमान आणि नव्याचा तिरस्कार अशा गोष्टी निंदेच्या मुळाशी असतात. माटे यांना नव्या प्रकारचे समाजकार्य करताना आपल्या आयुष्यातील सुखशांतीची किंमत द्यावी लागली आहे. कोणत्याही स्वार्थभावनेने प्रेरित होवून त्यांनी हे कार्य चालू केले नव्हते पण माटे यांच्या विचारातली व आचारातली रचनात्मकता समजू न शकणारा फार मोठा असा जुन्या वळणाचा सनातनी समाज त्याकाळी पुण्यात आणि महाराष्ट्रात होता. अस्पृष्टांच्या वस्तीत जाऊन त्यांना शिकवणे, त्यांच्या परिभाषा भरवणे, त्यांना समानतेच्या पातळीवर आणण्यासाठी धडपड करणे हा साराच प्रकार कर्मठ लोकांच्या दृष्टीने धर्मविरोधी होता. त्यामुळेच माट्यांच्या पदरात फुलांऐवजी शिव्याशापांचे दगडधोंडे येवून पडले यात आश्चर्य मानण्याचे कारण नाही. स्वत: माटे यांची त्याबाबतीत मानसिक तयारी झाली होती. माट्यांना समाजाने एखदा मानसिक त्रास दिला तरीही ते विनयाने सांगतात की,

"काही मुलखावेगळे करू लागलेल्या माणसाचा समाज छळ करतो, असे आपण नेहमी ऐकतो. मी करीत असलेले काम मुलखावेगळे होतेच; आणि मी ते स्पृश्य समाजाच्या आणि त्यातही ब्राह्मण समाजाच्या वस्तीत राहून करीत होतो. पण मला हे आनंदाने सांगावेसे वाटते की, ज्याला "छळ" हे नांव शोभेल, असा कोणाचाही प्रकार समाजाने माझ्या बाबतीत केला नाही."[३१]

अस्पृश्यता निवारणाच्या या कार्यात अस्पृश्यांचे कौटुंबिक जीवनही सुधारावे असा माट्यांचा प्रयत्न होता. काही व्यसनी लोक

व्यसन भागविण्यासाठी सावकाराकडून कर्ज काढीत असत. वस्तुत: कष्ट करणाऱ्या या माणसांना थोडाफार पैसा कसाबसा मिळत असे, "पण व्यसनाधीनता फार दारू पिणे व हॉटेलात जाणे हे यांचे शत्रू आहेत हे शत्रू तिसऱ्या एका शत्रूला घरांत घेऊन येतात तो शत्रू सावकार हा होय."[32] यांची व्यसनी प्रवृत्ती कमी करून त्यांना नीटनेटके कष्ट करून मिळालेल्या पैशावर कसे सुखसमाधानाने जगावे हे माट्यांनी पटवून दिले.

पुढे माझा छळ विशेषत्वाने का झाला नाही याचे कारण सांगतात ते म्हणजे एक तर माटे कुणालाही दुखावत नसत. समाज-सुधारणेच्या बाबतीत त्यांनी समन्वयवादी भूमिका स्वीकारली होती. "जर समाजाला इतके अप्रिय वाटणारे काम मी करीत होतो तर त्याने माझा एवढा दुस्वास करावा यात काय आश्चर्य ?" शंकराचार्यांना प्रत्युत्तरे करण्यापलिकडे बाकी कोणाच्याही आक्षेपांना आणि शिव्या-गाळीला मी कधीही उत्तर केले नाही. त्यांतही एक गोम होती मी टिळकांचा पराकाष्ठेचा अभिमानी, हा अभिमान मी व्याख्यानांतून प्रकट करीत असे; हिंदुत्वाला आवश्यक असे रामकृष्णाच्या चरित्राचे सुरस प्रतिपादन मी सभांतून करीत असे; आणि ज्ञानेश्वर तुकाराम यांच्या वाङ्मयीन व पारमार्थिक वाङ्मयाची मर्मे सभेला आलेल्या तरुणांना मी समजावून सांगत असे आणि हे सारे माझे तसे खरे मत होते म्हणून अर्थात आक्षेपकांनासुध्दा चिणचिण करण्यापलिकडे कांही करता येत नसे. माझ्या मानाने मोठाल्या सुधारकांचे केवढे तरी छळ समाजांत झाले, आणि ते त्यांनी निमूटपणे सहन केले. त्यांच्यापुढे मी काहीच नव्हे."[33] यातूनही त्यांची विनयवृत्तीच प्रकट होते.

अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात माट्यांनी आपल्या आयुष्यांतली जवळजवळ वीस वर्षे निस्वार्थ भावनेने वेचली. अस्पृश्यांच्या

वस्त्या स्वत: झाडण्याचेही काम त्यांनी केले. खरे तर हे काम नगरपालिकेने आणि त्या भागात राहणा-या रहिवाशांचे होते. पण स्वच्छतेची जाणीव या रहिवाशांत फारशी नसल्यामुळे अस्पृश्य वस्त्या सदैव अस्वच्छ रहात असत. "हे दुरूस्त व्हावे म्हणून एक प्रयोग करावयाचे मी ठरविले. आपण खराटा घेऊन झाडण्याचे काम सुरू करावे; म्हणजे तेथील तरूण लोक तरी आपले पाहून तसे करू लागतील अशा कल्पनेने मी बेत कायम केला."[३४]

माट्यांनी वस्ती झाडण्याच्या कामापासून अस्पृश्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यापर्यंत जी कामे केली ती महत्वाची आहेत. ज्याला सामाजिक कार्य करायचे आहे त्याने प्रथम खोटया प्रतिष्ठेच्या कल्पना बाजूला सारल्या पाहिजेत. आपल्या ज्ञानाचा आणि तथाकथित उच्च कुळाचा अहंकार झटकून टाकला पाहिजे. पण स्वत:ला कुलीन समजणा-या सवर्ण लोकांना हे जमत नाही ते आपल्याच तथाकथित उच्च वलयात राहतात. आणि मग सर्व-साधारण माणसे त्यांच्यापासून दुरावतात. खरे सांगायचे तर हिंदु धर्माच्या तत्वज्ञानात मानवी समतेवर भार देण्यात आलेला आहे. वारकरी संप्रदायाने "अवघिया पुरते ओसंडले पात्र" असे म्हणून माणसांच्या समत्वाची घोषणाच केली आहे. संत तुकारामानी तर रंजल्या गांजल्यांना पोटाशी धरण्याचा उपदेश केला असून सारे जग "विष्णुमय" आहे म्हणून कोणत्याही अमंगल अशा भेदभावनेला येथे जागाच नाही असे प्रतिपादन केले. धर्मात भूतदया, प्रेम आणि करूणा व मानवतावाद असूनसुध्दा प्रत्यक्ष आचारात, दैनंदिन व्यवहारात मात्र विषमता सर्वत्र आढळते. माट्यांचा कालखंड जुना झाला असला तरी आजही विषमतामूलक विचारसरणी अनेक संस्थातून दिसून येते. उच्चनीच भाव अद्यापी संपलेला नाही. आजही समाजात नाना प्रकारचे जातिभेद, पंथभेद

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

असून उच्चनीचपणाची कल्पना कोठेतरी मूळ धरून आहे. माट्यांना हा अनुभव कार्य करताना आलेला होता. वारकरी पंथातल्या लोकांनी अस्पृश्यांसाठी वेगळे मंदिर बांधले जावे या कल्पनेलाही मान्यता दिली नव्हती. हा उल्लेख माट्यांच्या आत्मकथनात आहे. ज्यांच्या हातात धार्मिक सत्ता आहे अशा लोकांनीही साधुसंताचा उपदेश डावलून जातिपातींच्या भिंती सांभाळून ठेवाव्यात; हा एक प्रकारचा असहिष्णु वृत्तीचा खेदजनक अविष्कार आहे. अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात माट्यांना समाजातल्या भिन्नभिन्न प्रवृत्ती दिसल्या आणि त्यातून त्यांच्या समाजचिंतनाला अधिकच गती प्राप्त झाली. अस्पृश्य वस्ती झाडून स्वच्छ करण्याचीही कल्पना तशी नवीन नाही. स्वत: माटेच म्हणतात,

"वास्तविक, ही कामे मागे थोर दर्जाच्या संतांनी केलेली, व आम्ही तर त्यांतले कोणीच नव्हतो. या कामाला प्रसिध्दि दिली, तर आपण आपल्याकडे भलताच अधिकार घेतो, व कधीही न झेपेसे मोठेपण आपण आपल्याला चिकटवितो, असा त्याचा अर्थ होईल, या कल्पनेने मी या कामाला प्रसिध्दी दिली नाही. त्या त्या वस्तीतील मुलांना धडा घालून देणे यापलिकडे माझ्या या कृत्याला अर्थ नव्हता."[३५] माट्यांची ही प्रांजळ कबुली त्यांच्या स्वच्छ मनावर प्रकाश टाकते. मांगवाडा, चांभारवाडा इ. वस्त्या ते झाडून स्वच्छ करीत असत. आपल्या सहकाऱ्यांच्या बरोबर वस्तीत स्वच्छता करण्याचे काम त्यांनी केले. पण निस्वार्थी कामावरही स्वार्थ प्रवृत्तिचा आरोप काही लोकांनी केला. हा उल्लेख त्यांनी केला आहे. "हे लोक मतलबी आहेत, कावेबाज आहेत, आपल्या सेवेचा डांगोरा करून कीर्ति मिळविण्याचा यांचा हेतू आहे."[३६] अशी काही माणसांची तरी कुरबुर असे. कोणी एकाने "चोरटे अस्पृश्यता निवारण" अशा

शीर्षकाखाली वृत्तपत्राकडे लेखही पाठविले. हे सारे अनुभव घेत माटे आपले कार्य मात्र निष्ठेने करीत राहिले. लेखक म्हणून, विचारवंत म्हणून, एक शिक्षक म्हणून माटे मोठे आहेत हे खरे; पण त्यांना आलेला "माणुसकीचा गहिवर" हा सर्वात अधिक मोठा आहे. माट्यांच्या जीवनात आणि साहित्यात माणुसकीचा झरा झुळझुळताना आढळतो हेच त्यांच्या जीवनाचे खरे सौंदर्य आहे.

धर्मशास्त्रांचा अभ्यास केलेल्या परमधार्मिक समजल्या जाणाऱ्या व भक्तांच्या भक्तीचा विषय झालेल्या धर्माचार्यांची मते सुध्दा अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्याला फारशी अनुकूल नव्हती हे माट्यांच्या लक्षात आले. याचे एक ढळढळीत उदाहरण त्यांनी पृष्ठ ३०९ वर दिले आहे. संकेश्वरच्या शंकराचार्यांना चर्चेसाठी टिळक मंदिरात माट्यांनी बोलावले होते. माटे म्हणतात, "आचार्यांनी आमंत्रण पत्करले; पण मला अट घातली की, या सभेच्या वेळी तुम्ही अस्पृश्य समाजापासून वेगळे, निराळ्या बैठकीवर बसले पाहिजे. मी त्यांना म्हटले की, "तुम्हीही त्यांच्या बैठकीवर बसा, असा आग्रह मी धरत नाही; पण मला निराळे बसावयास सांगता, हे मात्र मी कधी पत्करणार नाही."[३७] आचार्यांना माझे म्हणणे पसंत पडेना; आणि म्हणून सभेच्या जागी येण्याचा त्यांचा बेत रहित झाला.

हे उदाहरण काय दर्शविते ? शंकराचार्यांसारख्या तथाकथित धर्मज्ञ व्यक्तीसुध्दा अस्पृश्यांना अशा पध्दतीने हीन लेखतात की, त्यांच्याबरोबर एका बैठकीवर सवर्णांनी बसू नये असे त्यांना वाटते. याचाच अर्थ अस्पृश्यतेचे निर्मूलन हा एक अत्यंत जटिल आणि चमत्कारिक प्रश्न होऊन बसलेला होता. खरा तर हा अत्यंत दुर्दैवी प्रश्न होता. या कमालीच्या दुर्दैवी प्रश्नामुळे सारा हिंदु समाज पोखरून गेला होता. माटे स्वत: हिंदुत्वनिष्ठ होते. हिंदु समाज दृढ आणि एकसंध व्हावा यासाठी समाजातल्या साऱ्या अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जाती मोडून

टाकाव्यात ही त्यांची भूमिका होती. निदान या जातींना हिंदू समाजात समान न्याय मिळावा, त्यांना माणुसकीच्या अधिकारापासून वंचित राहावे लागू नये. अस्पृश्यांनाही मानाने जगता यावे आणि त्यांच्यात शिक्षणाचा व संस्कृतीचा प्रसार व्हावा ही माट्यांची भूमिका होती. माट्यांच्या दृष्टिकोनात भूतदयावादाचा अंश असू शकेल. पण केवळ अस्पृश्यांची कीव येवून त्यांनी हे कार्य आरंभीले होते असे मात्र नव्हे. भूतदयेच्या मलमपट्टया लावून विषमतेमुळे झालेल्या जखमा कधीच भरुन येत नाहीत हे समजण्याइतके माट्यांचे समाजचिंतन प्रगल्भ स्वरुपाचे होते. खरा प्रश्न हा होता की, मूळात एक माणूस दुस-या माणसाहून अधिक उच्च किंवा नीच कसा काय असू शकतो ? माणसांनी अहंकाराने - मग हा अहंकार ज्ञानाचा असो, वंशाचा असो की आणखी कोणत्या प्रकारचा असो - अशा अहंकाराच्या आहारी जाऊन शेकडो वर्षे कोट्यवधी लोकांना पशुपेक्षाही हीन अवस्थेत ठेवण्यात आले. एकाने राजरोसपणे गावात राहायचे, कुलीन आणि प्रतिष्ठित म्हणून घ्यायचे, आणि अनेक लोकांना वेशीच्या आत प्रवेशही नसायचा. त्यांनी ठेंगण्या गलीच्छ झोपड्यांतून राहायचे, शिक्षणाची, सत्तेची आणि संपत्तीची सारी दारे त्यांच्यासाठी "धर्माज्ञेवरुन" बंद करुन ठेवलेली असायची यात न्याय नाही. नीती नाही आणि तार्किक संगतीही नाही. जन्माने माणसे उच्च होतात आणि जन्मत:च माणसे नीच जातीचे असतात यासारखा अत्यंत अडाणी दुसरा सिध्दांत असेल काय ? याची शंका वाटते. कोण्या एके काळी लिहिल्या गेलेल्या एखाद्या पोथी पुराणातली काही वाक्ये उध्दृत करुन अस्पृश्यतेचे समर्थन कित्येक शतके शहाणी समजली जाणारी माणसे करीत राहिली याची खंत माट्यांच्या मनात निश्चितपणे होती. माटे फुले आंबेडकरांसारखे सर्वांगीण क्रांतीकारक नव्हते. म.गांधीच्या प्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्व

व्यापक नव्हते पण अस्पृश्यता निवारणासाठी या महाराष्ट्रात ज्या समाजसुधारकाने प्रामाणिकपणे वर्षानुवर्षे स्वार्थत्यागपूर्वक प्रयत्न केले त्यांत माट्यांचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. त्यांच्या प्रामाणिक हेतूविषयी जर कोणी शंका घेत असेल तर ते समूळ चुकीचे आहे याची जाणीव माट्यांचे समग्र जीवन पाहून होऊ शकते.

प्रस्तुत आत्मचरित्रात अस्पृश्यता निवारणाच्या आपल्या कार्याची विस्तृत माहिती माट्यांनी दिली आहे. ती वाचताना एक प्रांजळ समाजसुधारक आपल्या जीवनातील अनेक संघर्षांचा आढावा सच्चेपणाने घेत आहेत हे लक्षात येते. कित्येक आत्मचरित्रात लेखक स्वत:चे महत्व वाढवण्यासाठी आपल्या कार्याचे आणि कर्तृत्वाचे अतिशयोक्तीपूर्ण भाषेत वर्णन करीत असतो. आत्मचरित्रात आत्मसमर्थन करणे आणि आपल्या अहंकाराचे ऐसपैस प्रदर्शन करणे हाच त्यांचा हेतू असतो. आपल्या सारखा कोणी झाला नाही, आपण किती ध्येयवादी, किती स्वार्थत्यागी, किती ज्ञानी आणि पराक्रमी. असे एक काल्पनिक चित्र आत्मकथनातून काही लेखक उभे करीत असतात. माट्यांचे प्रस्तुत आत्मकथन मात्र अंतर्बाह्य प्रामाणिक स्वरूपाचे आहे यात संशय घ्यायला जागा सापडत नाही. दुसरे असे की माटे ब्राह्मण असले आणि हिंदुत्ववादी असले तरी अस्पृश्यतेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन माणुसकीचा होता, न्यायाचा होता याबद्दलही संदेह उरत नाही. अन्यथा वीस वर्षे एक शाळामास्तर आपले शिकवणीतले सारे उत्पन्न या कामी लावतो आणि अस्पृश्यांच्या वस्त्यांत जाऊन त्यांना शिकवण्याची व माणसांत आणण्याची धडपड करतो या गोष्टी घडल्या नसत्या.

माट्यांनी म्हंटले आहे, "धर्माची कल्पनाच बदलावयास हवी." या परिच्छेदात - "समाजांत या विषयासंबंधीचे जसे व जितके खोल प्रतिपादन व्हावयास हवे तितके झालेले नाही, असे माझे अजूनही मत आहे. वरच्या लोकांना राजकारणाच्या पेचाच्या द्वारा या विषयाचे मर्म कळले आहे. पण त्यांतील जो शुध्द सामाजिक विचार आहे, मानवप्राण्याच्या स्वाभाविक अधिकाराबद्दल जी एक गंभीर कल्पना समाजास कळावयास हवी; व हिंदु धर्माचे बाह्य अधिक विस्तृत कसे करावयास हवे, याचे ज्ञान जितके व्हावयास हवे, तितके समाजाला झालेले नाही. चांगल्या चांगल्या पुढाऱ्यांना ते या मुद्दयावर आल्याबरोबर, लोक झिडकारून लावतात. त्यांतले रहस्य हेच आहे की, तो विषयच त्यांना कळलेला नाही. धर्म म्हणजे काय याची कल्पनाच बदलावयास हवी, याचे प्रत्यंतर समाजांत शिरल्याने चांगले येते."[३८]

हे कार्य करीत असताना माटे यांना एक वृध्द मांग म्हणाला, करतां आहां हे ठीक आहे, पण हे करायला तुम्हांला फार उशीर झाला."[३९] या वाक्याचा माट्यांनी मुद्दाम उल्लेख केला आहे याचे कारण अस्पृश्यता निवारणाची चळवळ फारच उशीराने सुरू झाली. म.फुले हे पहिले समाजसुधारक. त्यांनी १९ व्या शतकात हे आंदोलन उभे केले. पण या आंदोलनाला जेवढी गती मिळायला हवी होती तेवढी मिळू शकली नाही. महाराष्ट्रातच थोडी फार गती मिळाली. भारतातल्या इतर प्रांतात "अस्पृश्यता" लोकजीवनात अत्यंत खोलवर रूजून बसली आहे. अगदी विसाव्या शतकाच्या सातव्या दशकात सुध्दा अस्पृश्य जातीचा माणूस आम्ही मुख्यमंत्री किंवा प्रधानमंत्री होऊ देणार नाही असे राजरोसपणे सांगितले जाते. आणि या घोषणेला लोकांचा पाठींबा देखील मिळतो. हे चित्र खरोखरच हेच दर्शवते की हे काम करायला फार उशीर होऊन गेला आहे. स्वत: माट्यांनीच

"जातीच्या हरळीचे मूळ" नावाचा एक निबंध लिहिला आहे याचा येथे उल्लेख संयुक्तीक होईल. हरळीचे मूळ ज्याप्रमाणे संपूर्णतया उपटून काढता येत नाही त्याप्रमाणे जातीपातींच्या आणि विषमतेच्या भ्रामक कल्पना लोकमानसात खोलवर गेलेले आहेत. प्राचीन काळापासून या कल्पना नष्ट करण्यासाठी बुध्द महावीरांनी प्रयत्न केले. आज त्यांच्याच देशात विषमतेचे पिशाच्च स्वैर संचार करीत आहे. पण या पार्श्व-भूमीवर महाराष्ट्रात समताविचार प्रस्थापित करण्याचे जे थोडे फार प्रयत्न होत राहिले त्यात श्रीपाद महादेव माटे या एका शिक्षकाने केलेला प्रयत्न निश्चितच उल्लेखनीय होता. अस्पृश्यतेच्या कल्पनेवर माट्यांनी एक प्रबोधनकार आणि कार्यकर्ता या नात्याने जे घाव घातले त्यामुळे पुण्यासारख्या सनातनी शहरात आणि काही अंशाने महाराष्ट्रात लोकांची मनोभूमिका थोडीफार माट्यांना अनुकूल झाली असे विधान करता येते.

माटे यांनी चित्रा एकोणीसावे या प्रकरणात म्हंटले आहे, "माझ्या मनाला अजूनही असा एक आनंद वाटतो की, आपल्या हयातीतील ऐन कर्तृत्वाच्या वर्षापैकी वीस वर्षे आपल्या आपद्ग्रस्त बांधवांचे थोडे तरी बरे व्हावे, म्हणून आपण शरीर कष्टविले, वाणी व लेखणी शिणविली, आणि शिक्षकाच्या धंद्याला न झेपेसा स्वार्थत्यागही केला. मला केवळ हे समाधानच लाभले आहे, असे नव्हे, तर या समाजांत फार जवळूनराबत राहिल्याने एखादया प्रश्नाकडे सामाजिक दृष्टीने पाहणे म्हणजे काय, याचे मला बरे ज्ञान झाले; दृष्टि कांहीशी सामाजिक बनली; आणि याचा उपयोग वाङ्मयाच्या अभ्यासांत व कॉलेजांतील व सार्वजनिक क्षेत्रांतील व्याख्यानांत मला फार होऊं लागला. त्यावेळी लहान असलेले व पुढे शाळा-कॉलेजात माझे विद्यार्थी झालेले अनेक अस्पृष्ट विद्यार्थी मात्र प्रौढपणी या माझ्या सेवेची किंमत बरोबर ओळखू लागले; आणि

त्यांच्यासाठी मी जे वाङ्मय लिहिले आहे, व लिहित आहे, ते वाचून तर अजूनही, त्यांतले कित्येक आपली कृतज्ञता व्यक्त करतात. आंतरिक समाधानाच्या जोडीला हेही दोन मोठे लाभ मला झाले."[४०]

महात्मा गांधींना माट्यांनी एक अनावृत्त पत्र लिहून आपले मत नम्रतेने पण स्पष्टपणे कळवले होते. उपोषणासारख्या दडपणाच्या प्रक्रियेतून अस्पृश्यता निवारण होणार नाही त्यासाठी विचार - परिवर्तनाचाच आग्रह धरून लोकप्रबोधन केले पाहिजे असा त्या पत्राचा आशय होता. माट्यांचे हे म्हणणे बरोबर असले तरी विषमतेच्या मुळावर घाव घालून अस्पृश्यता नाहीशी करण्याचा एक मोठा आणि व्यापक कार्यक्रम देशपातळीवर गांधीजींनी हाती घेतला होता. त्यांना माट्यांचा मुद्दा सर्वार्थाने मान्य झाला नाही. पण माट्यांनी आपली भूमिका सोडली नाही. हा उल्लेख मागे येवून गेला आहे. त्याची पुनरुक्ती न करता इतकेच म्हणता येते की, गांधीजींसारख्या एका श्रेष्ठ नेत्यालाही प्रांजळपणे आपले मतभेद कळविण्याचे धारिष्ट्य माट्यांजवळ होते. पुढे श्री. बजाज यांनी त्यांना एक मोठी नोकरी देऊ केली पण माट्यांनी ती नाकारली. ही गोष्टही त्यांच्या स्वभावावर प्रकाश टाकणारी आहे. माटे म्हणाले होते, "मला पसंत नसलेली पुढाऱ्यांची मते खांद्यावर घेऊन ती गावांत सांगत सुटणे माझ्याच्याने होणार नाही. अभ्यासाने मी कांही मते बनविली आहेत. तुम्ही म्हणतां, त्या अटीवर माझ्याच्याने काम व्हावयाचे नाही."[४१]

जे आपल्या मनाला आणि बुध्दीला प्रशस्त वाटते तेच करायचे. मन:बुध्दीचा कौल बाजूला सारून केवळ मानसन्मान अथवा पैसा यांच्यासाठी काही करायचे नाही, हा ध्येयवादी माणसाचा बाणा माटे यांनी दाखविला. याबद्दल त्यांच्याविषयी आदरच वाटतो. आजच्या जगात आणि पूर्वीही सत्ता आणि संपत्ती किंवा प्रतिष्ठा यांच्यासाठी आपली विचारसरणी पूर्णपणे गुंडाळून ठेवणारे अनेक विचारवंत होते व आहेत.

माटे तर एक मध्यमवर्गीय मास्तर. बालपण आणि विद्यार्थी अवस्था पूर्णपणे दारिद्र्यात गेलेली एखादया व्यवहारनिष्ठ माणसाने श्री.बजाज यांनी सोपवलेली जबाबदारी आनंदाने स्विकारली असती. पण माट्यांनी ती नाकारावी यात त्यांच्या मनाचा आणि विचारांचा पिळ किती सुदृढ होता हे दिसते. व मनाला एक प्रकारचे समाधान मिळते.

१९१७ ते १९३७ अशी वीस वर्षे अस्पृश्यता निवारणाच्या चिवट कार्यात व्यतित केल्यानंतर हे काम माटे यांनी स्वत:च्या इच्छेने सोडून दिले. ते लोकापवादाला भ्याले नव्हते कोणाच्या धाकदपडशाने हे काम त्यांनी सोडलेले नव्हते. पण आता आपण या कार्यातून दूर व्हावे असे त्यांना वाटू लागले. याची त्यांनी तीन कारणे दिली आहेत.

१] या कामात शारीरकष्ट फार पडत होते. "आणि सोसासोसाने अंगावर घेतलेली कामे आता निभातील असे मला वाटेनासे झाले."[४१]

२] ज्या खाजगी क्लासच्या बळावर माट्यांनी हा उद्योग चालविला होता तो खाजगी क्लास बंद झाला. काही प्रापंचिक आपत्तीही मोठया आल्या.

३] "आपली उपयुक्तता या कामात संपत आली आहे असे मला चक्क दिसू लागले."[४२]

माट्यांच्या कार्याची महती न ओळखणारे स्पृश्य आणि अस्पृश्य पुढारी त्या काळात होते. विशेषात: ज्यांच्यासाठी हे कार्य करायचे त्यांनाही याचे महत्व नीटसे पटत नव्हते. वीस वर्षे प्रतिकूल परिस्थितीत हे कार्य चालवल्यानंतर एक प्रकारचा मानसिक आणि शारिरीक धक्का त्यांना जाणवू लागला याचा परिणाम आपले हे विशिष्ट स्वरूपाचे, परिवर्तनाला सहाय्यभूत होणारे कार्य माटे यांना स्थगित ठेवावे लागले.

एक प्रश्न नेहमी उद्भवतो, समाजासाठी तनमनधनाने झिजणाऱ्या अनेक प्रामाणिक कार्यकर्त्याला अशा प्रकारचे वैफल्य आलेले दिसते. ते का यावे ? ज्यांच्यासाठी संपत्ती वेचावी, शक्ती वेचावी, त्यांनासुध्दा या सेवाकार्याचे विशेष महत्व वाटू नये याचे आश्चर्य वाटते. समाज बहुधा सर्वच काळात वैचारिक दृष्टया बधीर असतो. समकालीन लोकांना तर तो न्याय देतच नाही. पण त्यांच्या कार्याची कुचाळी करून समाधान मानतो. हा अनुभव सर्वच श्रेष्ठ व्यक्तींना आलेला आहे. संत ज्ञानेश्वरांनाही आपली ताटी यासाठीच बंद करावी लागली. "ताटी उघडा ज्ञानेश्वरा" असे म्हणणारी मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना प्रेमळ सल्ला देते. सर्वच ध्येयवादी कार्यकर्ते केंव्हाना केंव्हा वैफल्याने वेढले जातात. कित्येक कार्यकर्त्यांना सुरूवातीलाच निराशाजनक अनुभव आल्यानंतर आपले कार्य सोडून दयावे लागले असेल. फुले,आगरकर,आंबेडकर यांच्याप्रमाणे आपल्या कार्याला सर्वशक्ती एकवटून चिकटून राहणारे फारच थोडे असतात. वीस वर्षांच्या वाटचालीनंतर माट्यांच्या मनात विफलतेच्या रेषा उमटू लागल्या ते व्याकुळ झाले आणि मग नंतर त्यांनी कार्य स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला.

सारांश - आपल्या आयुष्यात माट्यांनी सर्वात लक्षणीय आणि अनुकरणीय असे हे कार्य वीस वर्षे केले. त्यात ते किती विजयी झाले किंवा ते कसे पराभूत झाले याची चिकित्सा जर कोणी गणिती पध्दतीने करू म्हणेल तर ते अन्यायाचे ठरेल. यशापयशाचे हिशोब गणित मांडणे सोपे असते. माट्यांचा सामाजिक दृष्टिकोन पुरोगामी व न्यायोचित असल्यामुळे त्यांच्या कार्याच्या पाऊलखुणा महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात जरूर उमटले आहेत. प्रस्तुत आत्मचरित्रातील अस्पृश्यता निवारणाच्या कार्याची माहिती देणारी ही प्रकरणे उत्कृष्ठ आहेत.

सनातनी सुधारक :

एक समाजसुधारक म्हणून माट्यांचे स्थान निश्चितच मानाचे आहे. माट्यांच्याही अगोदर रानडे, लोकहितवादी, भांडारकर यांनी थोडेफार समाजकार्य केले होते. परंतु त्यांनी स्वीकारलेली समाज सुधारणाची पध्दती ही ठरीव साचेबंद स्वरूपाची होती. माटे जेंव्हा समाजसुधारक म्हणून अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात उतरले तेंव्हा त्यांना यापूर्वीच्या सुधारकांची तत्वे पटली नाहीत. कारण त्यांनी स्वीकारलेली तत्वे पाश्चात्य विचारसरणीवर आधारलेली होती. माट्यांनी मात्र प्रथम हिंदुधर्माचा सखोल अभ्यास केला. त्या विषयाचे मूळ शोधून काढले व वास्तवावर आधारीत अशी काही स्वत:ची मते [तत्वे] मांडली. व मगच अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास आरंभ केला.

हिंदु समाजाचा अभ्यास करताना त्यांना असे आढळून आले की, अस्पृश्यतेचा व एकंदर हिंदुच्या वर्ण व्यवस्थेचा प्रश्न हा धार्मिक नसून वंशिक आहे. आपल्या या कार्याला त्यांना शास्त्रीय अभ्यासाचे अधिष्ठान प्राप्त करून द्यावयाचे होते म्हणून त्यांनी याचा तपशिलवार अभ्यास केला.

प्रा.माट्यांना "सनातनी समाजसुधारक" असे म्हंटले जाते, कारण ते नव्या विचाराबरोबर जुन्या विचारांचा देखील आदर करतात. जुनी मुल्ये जपतात. त्यांचा त्याग करावा असे त्यांना वाटत नाही. पिढयानपिढया आपल्या पूर्वजांनी दीर्घ परीश्रम करून जपून ठेवलेल्या या सांस्कृतिक मुल्यांचा, त्यातील अमर चिरंजीव तत्वांचा अभिमान धरलाच पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. यानुसारच त्यांनी अस्पृश्यतेची उपपत्ती लावली आहे. याशिवाय प्राचीन काळच्या त्रैवर्णिकांच्या वंशरक्षणाच्या प्रयत्नाचे विवेचनही त्यांनी या

पूर्वपरंपरेच्या अभिमानानुसारच केलेले आढळते. "परशुराम चरित्रातील पांच भिन्न मानववंशाची एक मूस करण्यासाठी प्राचीनांनी जो दिव्य पराक्रम केला" असे जे सांगितले आहे. त्याच्यामागेही हा पूर्वपरंपरेचा अभिमानच आहे. ऐतिहासिक दृष्टीने म्हणजे मागील काळातील थोर पराक्रमी पुरूषांच्या ब्राह्मण, मराठे वगैरेंचा अभिमान धारणे, त्यांच्या कार्याचा गौरव करणे ह्या त्यांच्या वृत्तीलाच लोकांनी सनातनी हे नांव दिले.

माटे या जुन्या गोष्टीचा अभिमान बाळगत असले तरी त्या काळी अस्पृश्यांवर झालेल्या घोर अन्यायाचा निषेधही केला आहे. व हिंदु धर्मातील काही अनिष्ठ चालीबद्दल टीकाही केली आहे. कारण आपल्या समाजात धर्मात कुठल्या गोष्टी चांगल्या आहेत, कुठल्या वाईट आहेत हे इतरांना समजावेत व त्यांनीही या अनिष्ठ रूढींचा निषेध करावा असा त्यांचा यामागचा दृष्टिकोन होता. माटे या संदर्भात म्हणतात,

"आज आपल्या देशांत चतुर्वर्ण +- अस्पृष्ठ +- वन्य +- मुसलमान +- खिस्ती यांची व देशाची समव्याप्ति मानावयास हवी आहे."[४४] असे का व्हावयास हवे ? हे समजण्यासाठी त्यांनी पूर्वीच्या काळी लोकांनी समाजाचे एकीकरण करण्यासाठी जे प्रयत्न केले. व असे करताना त्यांना यशापयश कसे आले याचा सखोल अभ्यास केला. तेंव्हा त्यांना असे आढळून आले की, ही जुनी वैरे, व ह्या काही जुनाट बुरसटलेल्या कल्पना यांचा त्याग केलाच पाहिजे त्याशिवाय अस्पृश्यांचा उध्दार होणे कठीण आहे. यावरून माट्यांच्या सामाजिक तत्वांची कल्पना येते.

मागे घडलेल्या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये असे त्यांना मनोमन वाटे व यासाठी ते प्रयत्नशील रहात. आपली जुनी शास्त्रे

बाजूस सारून आपण अस्पृश्यांना समान संधी दिली पाहिजे. नाही तर त्यांची मानवता प्रगल्भ होणार नाही व आपल्या राष्ट्राचा घात होईल असेही माट्यांनी सांगितले आहे. माट्यांचा सनातनीपणा हा असा आहे.

प्रा.माटे स्वत:ला "सनातनी सुधारक" म्हणवितात याचा त्यांना अभिमानही वाटतो. माटे कट्टर हिंदुत्ववादी होते. वेळ पडल्यास आपले मत मांडण्यासाठी शास्त्री पंडितांशी वाद घालतील पण त्यांची अवहेलना मात्र कधीही करणार नाहीत. माटे ह्या-या अर्थाने पुरोगामी व बुध्दीवादी होते. माटे फक्त अस्पृश्यांच्या प्रश्नासाठीच झगडले नाहीत तर ब्राह्मण समाजाचीही पाहणी त्यांनी पत्रके वाटून, घरोघरी जाऊन केली आहे. माट्यांनी हिंदु समाजाची तळापासून ते शेवटच्या धारापर्यंत पाहणी केली व हिंदु समाजाविषयी स्वत:ची जी काही मते असतील ती त्यांनी परखडपणे समाजापुढे मांडली व त्यांतील दोषांवर जोराचा प्रहार केला.

त्यांची समाजसुधारणाची पध्दती वेगळी होती. माटे म्हणतात, "समाजसुधारणा करण्यासाठी समाजातून अलग व्हावेच लागते असे नाही तर समाजात राहूनही समाजसुधारणा चांगल्या प्रकारे करता येते."[४५] समाजसेवा करावयास आपल्या जुन्या धर्माच्या पोटात पुरेसा वाव आहे असे त्यांना वाटे. आपण अस्पृश्यांना जर हिंदुधर्माची प्रजा मानतो तर चळवळ सुध्दा हिंदुच्या पूर्वकालीन विचारधनाच्या बळावरच करावी ही भावना त्यांच्या मनी प्रबळ वसली होती म्हणून माट्यांनी एकांगी दृष्टिकोनातून आपले मत कधीही मांडले नाही. पूर्णत: वस्तुस्थिती जशीच्या तशी स्वीकारून वास्तवावर आधारलेली कार्यपध्दती त्यांनी स्वीकारली. समाजातच राहून कार्य केल्याने

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्यांच्याशी जवळीक साधता येते व आपले मत हळू हळू समाजाच्या मनात उतरविता येते म्हणून माट्यांना ब्रह्मसमाजाचे शिंदे यांच्या कार्याची पध्दती आवडली नाही. माटे म्हणतात,

"ब्रह्मसमाजाचे शिंदे यांनी शुध्द मानवधर्म कल्पनेने अस्पृश्यांच्या प्रश्नाला हात घातला होता आणि कित्येक वर्षे लोटल्यानंतर आणि हिंदु धर्माच्या पोटातूनच सुधारक लोक निर्माण होऊन त्यांनी सुधारणेचे काम आवेशाने चालू ठेवल्याने हिंदू समाजापासून कांहीशा अवमानांच्या कल्पनेने दूर राहणाऱ्या लोकांना आतां हिंदु समाजातले असे म्हणवून घेण्यास तितकीशी लाज वाटत नाहीशी झाली आहे; खास हिंदुत्वातील सुधारकांना या स्वतंत्र मतपंथवाल्यांची उन्नत विचारांच्या बाबतीत मोठीशी मातब्बरी वाटेनाशी झालेली आहे; व हे जे निराळे तंबू ठोकून बसलेले लोक, यांचाही ति-हाईतपणाचा अभिनिवेश ढिला पडूं लागून, आपणही खास हिंदुत्वातील सुधारकांकडून काही फारसे निराळे नव्हे, अशी सूक्ष्म प्रतीति त्यांस येऊ लागली आहे; व असा सुमार दिसतो की, निदान महाराष्ट्रात तरी ब्रह्मसमाज आणि प्रार्थना समाज या संस्था थोड्याच काळांत अगदी नामशेष होऊन जातील. समाजापासून फटकून निघाले तरी कांही विशिष्ट बाबतीतच फटकता येते; सगळ्याच्या सगळ्या जीविता-पासून दूर राहता येत नाही. काही पारमार्थिक तत्वांचा किंवा समाजकल्पनांचा निराळेपणा बुध्दीला पटला असला, तरी सामाजिक जीविताचा पायगोवा पूर्वीसारखाच राहतो; तोच प्रबळ ठरतो असे दिसते."[४६]

म्हणजे शिंदे यांनी "अस्पृश्यता निवारणाचे" कार्य कोणत्या भूमिकेवर स्वीकारलेले होते, हे सांगितले आहे. परंतु त्यांनी वेगळ्या धर्मपंथात जाऊन हे कार्य करावयास नको होते हे सविस्तर व पटण्या-सारखे सांगितले आहे.

शिंदे यांनी निराळा पंथ स्थापून समाजसुधारणेचे काम सुरू केले होते. निराळा पंथ स्थापन केल्यामुळे त्यांना जुना धर्म, जाती संस्था, धर्मग्रंथ इत्यादी बाबतीत हिंदु समाजापासून दूरच राहणे भाग होते. कारण ते हिंदु धर्म टाकाऊ म्हणून सुधारक बनून ब्रह्मसमाजात दाखल झाले होते. त्यांची भूमिका जवळजवळ नवधर्म स्थापनेची होती व त्या धर्माचे जे तत्व होते त्यास अनुसरूनच त्यांना कार्य करावे लागणार होते. माट्यांचे मात्र तसे नव्हते. त्यांनी पूर्वसंचिताच्या बळावर समाजात राहूनच कार्य करावयाचे ठरविले होते. त्यामुळे दोघांचे याबाबतीत पटले नाही. एक तर माटे जुन्या सनातन धर्माचे अभिमानी ते म्हणतात,

"ज्या प्रश्नाने समाजात सुधारणा करावयाची तो प्रश्न जर सोपा बनवावयाचा, तर त्याची इतर सामाजिक प्रश्नांशी गुंतागुंत करू नये; तसे केल्याने समाजापुढे एक मोठा बाऊ उभे केल्यासारखे होते; व आपणही हाती घेतलेला जो एक सुटा प्रश्न असतो, त्याच्या सोडवणुकीच्या कामी विनाकारण अडथळे उत्पन्न होतात."[४७] अशी माट्यांची विचारसरणी होती.

या जुन्या हिंदु धर्मात सुधारणा करण्याची त्यांची इच्छा होती. परंतु ह्या धर्माबद्दल त्यांना कधीही उपेक्षा बुध्दि उत्पन्न झाली नाही; आणि म्हणूनच त्यांनी ह्या धर्माच्या पोटी राहूनच "अस्पृश्यता निवारणा" चा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. आपल्या बुध्दीच्या आवाक्यानुसार त्यांनी या प्रश्नाचा निराळा आडाखा घातला व एकमेकांच्या सहकार्याने हे कार्य यशस्वी केले.

समाजाच्या सर्व स्तरात हा विषय खोल्ता ठेवण्याचा त्यांचा मानस होता. या निमित्ताने त्यांनी शास्त्रीपंडितांचे परिषादही

भारविले. त्यांच्या या धाडसी वृत्तीचे कौतुक वाटते.

अस्पृश्यांच्या प्रगतीतली सामाजिक बंधने ही अतिशय जाचक होती. ही बंधने दूर करण्याचा त्यांनी ध्यासच घेतला होता. भारतात भावी स्वातंत्र्य व लोकशाही निर्माण व्हावयाची असेल तर संपूर्ण समाजाचे सांस्कृतिक उन्नयन झाले पाहिजे असे त्यांना वाटे. हे सांस्कृतिक उन्नयन होण्यासाठी त्यांनी क्रांतीकारी मार्गाने न जाता उत्क्रांतीवादाचा मार्ग स्वीकारला. कारण आपण समाजाचे मत बदलण्याचे काम करीत असतो. तेव्हा त्यांच्याच कलेकलेने जावे लागणार अशी त्यांची धारणा होती. अगदी समाजाच्या फार पुढे जाऊन अभिनिवेशाने आपले मत आपण मांडित बसलो तर समाजाला फक्त वैचारिक धक्के बसतील, व फारसे दृश्य कार्य होणार नाही अशी त्यांची खात्री होती. जुन्या कल्पनेने पिढयानपिढया सुस्त झालेल्या समाजाला हलवायचे म्हणजे हे काम लवकर होण्यासारखे नव्हते. कुठलीही नवीन गोष्ट स्वीकारायला थोडासा वेळ लागणारच. कारण कुठल्याही समाजात पूर्णत: नवीन असे काहीच घडू शकत नाही. प्रत्येक आचार विचार नव्या प्रेरणा ह्या पूर्व संचिताच्या संस्कृतीच्या आधारानेच उभारलेल्या असतात. त्यामुळे बदल हा मंदगतीनेच होत असतो. त्यादृष्टीने मागील गोष्टींचा आधार घेऊनच पुढील गोष्टीत बदल घडवून आणता येतो असे त्यांचे ठाम मत होते.

आणखी एक गोष्ट माट्यांनी निश्चित केली होती ती म्हणजे हिंदु धर्मातील अनिष्ट गोष्टी काढून टाकायचे झाल्यास समाजात आतून बदल व्हावयास पाहिजे. ह्यासाठी समाजाबद्दल आत्मीयता आपुलकी बाळगली पाहिजे. समाजातून फुटून काम केल्यास समाजाच्या अंतरंगात अस्वास्थ्य उत्पन्न होईल व सुधारणेच्या दृष्टीने ते योग्य होणार

नाही; हे त्यांनी हेरले. समाजाच्या मर्जीस डावलून जबरदस्तीने काम केल्यास समाज चिडेल म्हणून उत्क्रांतीचा मार्ग त्यांनी अवलंबिला.

"परशुराम चरित्रात" शेवटी स्वतःच्या "सनातनी सुधारक" पणामागची भूमिका त्यांनी स्पष्ट केली आहे. ते म्हणतात, "क्रांती तीही सार्वत्रिक स्वरूपाची अशी प्रतिपादने एका स्वतंत्र युगमानात आरंभी आवश्यक आहे असे वाटू लागते हे खरे आहे पण विचार करिता दिसून येईल की, या प्रतिपादनातही मागला हिशोब सोडता येत नाही. आपल्या जीविताची सर्वच्या सर्व सूत्रे एकदम कमजोर ठरतात किंवा सर्वस्वी निकामी ठरतात असे मला वाटत नाही. आजवर होऊन गेलेल्या बुध्दीमान लोकांचे समुचित शहाणपण त्याज्य मानण्यासारखी परिस्थिती सध्या प्राप्त झाली आहे असे प्रतिपादणे अत्युत्साहाचे निदर्शक आहे व ते विवेकशीलतेचे निदर्शक आहे असे खासच म्हणता येणार नाही."[४८]

माट्यांचा मूळचा पिंडच समाजसेवकाचा होता. त्यांनी समाज-जीवनात प्रवेश केला तो समाजसुधारक या नात्याने. माट्यांनी प्रत्यक्ष वस्तीतच जाऊन त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्याच्या पध्दतीमुळेच माटे सामान्य जनतेला आपल्यातलेच वाटत. माट्यांना स्वतःला मोठे म्हणवून घ्यायचे नव्हते तर समाजात बदल करायचा होता. अस्पृश्यांवरचा अन्याय हटवायचा होता व अस्पृश्यतेच्या-मागची हिंदु समाजरचना व शास्त्रांची भूमिका बदलावयाची होती. म्हणून त्यांनी आपली सनातनी सुधारकाची भूमिका कायम ठेवली. त्यांच्या या वेगळ्याच वास्तववादी दृष्टिकोनामुळे महाराष्ट्रांतील समाजसुधारकांच्या क्षेत्रात त्यांना मानाचे स्थान आहे.

अवनत समाजाचे सांस्कृतिक उन्नयन झाल्याशिवाय त्यांचा उच्चवर्णीयांशी मिलाफ होवू शकत नाही असे सांगणारे माटे सनातनी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वाटत असले तरी त्यावेळी ते हिंदूंच्या प्राचीन समाजरचनाशास्त्राचा आदरही करीत. जे कोणी जनहितासाठी काही करू पाहतात. त्यांनी मागील चांगल्या गोष्टीचा संग्रह करावा व त्यांत कांही नव्या गोष्टींची भर घालावी असे माट्यांना वाटते. त्यांच्या अस्पृश्यतेनिवारणा-मागची भूमिका हीच होती यालाच त्यांनी "सनातनी सुधारक" ही शब्दसंहति लावलेली होती.

माट्यांचा एका गोष्टीवर खूपच विश्वास आहे, "आपल्या जीवनातील बहुतेक विचार वाडीच्या स्मानेच आलेले असतात; म्हणून मागच्या लोकांनी जे चांगले केलेले असेल ते निवडून घेऊन कायम ठेवण्याचे सनातनीपण. व जे नवे घेण्यासारखे आहे ते निवडून घेण्याचे सुधारकपण हया दोन्ही गोष्टी एकत्र आल्याने काम मजबुतीने होत जाते; म्हणून या दोर्ही विचारालाच सनातनी सुधारकपणा असे नाव माट्यांनी दिलेले आहे."[४९] हे नाव योग्यच आहे असे त्यांना वाटते.

अस्पृश्यता निवारणाच्या कामात पूर्वी जे काही झाले ते इतिहासातून वाङ्‌मयातून व धर्मचर्चेतून घेतलेले होते असे करणे स्वाभाविक होते. त्यामुळे आपला वैचारिक संबध निगडित राहतो. माटे या संदर्भात म्हणतात, "धर्म समाजकारण इ.पैकी जे ठेवून घेण्यासारखे असेल ते ठेवून घेतलेच पाहिजे. जुनी प्रत्येक गोष्ट टाकाऊ आहे आणि म्हणून तिचा त्याग केलाच पाहिजे असे त्यांना वाटत नाही. जुनी संस्कृती ही उपेक्षेला किंवा अवहेलनेला सदैव पात्र आहे असे नाही. त्यांतही काही चांगल्या गोष्टी घेण्यासारख्या असतात तर सारासार विवेकाने आपली बुध्दी चालवून जुन्या संस्कृतीतील काही गोष्टी ठेवून घ्याव्यात. ज्या नवीन गोष्टी घ्यायच्या त्या तपासून पूर्ण विचारान्ती घेतल्या पाहिजेत."[५०] या स्वत:च्याच मताला त्यांनी "सनातनी सुधारक" असे नांव दिले.

परंतु माटे हे रूढ अर्थाने सनातनी नाहीत. त्यांचा मन:पिंड अगदी अस्सल सुधारकाचा आहे हे जाणून घेण्यासाठी त्यांची "विज्ञानबोधाची प्रस्तावना" पुरेशी आहे.

## माटे यांचे वाङ्मयीन लेखन :

### स्फुट वैचारिक लेखन -

१९२० सालाच्या नंतर महाराष्ट्रात एक विचारवंतांची नवी पिढी उदयास आली त्यात माट्यांना मानाचे स्थान द्यावे लागेल. एक श्रेष्ठ समाजसुधारक, एक श्रेष्ठ साहित्यकार, एक उत्कृष्ठ लेखक, एक उत्कृष्ठ शैलीकार अशा विविध भूमिकांनी माटे आपणास परिचीत आहेत.

माट्यांनी आपल्या लिखाणाची सुरूवात साताऱ्याच्या शाळेत नोकरीस असताना केली. ते अच्युतराव कोल्हटकरांच्या सांगण्यावरून "देशसेवक" पत्रासाठी बातमीपत्रे पाठवीत असत. हे त्यांचे पहिले लिखाण होय. यानंतर त्यांनी महायुध्दाच्या काळात त्या परिस्थितीस अनुसरून "काळ" पत्रात काही लेख लिहिले. "अमेरिकन राज्यक्रांती","रशियन राज्यक्रांती", वगैरे. यानंतर कॉलेजजीवनात माट्यांनी थोडेफार काव्यलेखन केले आहे. "उषा", "केरळकोकिळ", या नियतकालिकांमधून त्यांनी "मुंग्याची फजिती", "शंकराचे तांडव", "शाकुंतलेचे यौवन", "अहल्येची भूपाळी" अशा काही स्फुट कविता लिहिल्या. काव्य रचना ही त्यांनी एक हौस म्हणून केली. यापेक्षा याला जास्त महत्व नाही.

पुढे माट्यांनी एम.ए.ला असताना "केरळकोकिळ" मध्ये काही टीकालेख लिहिले. याच काळात एका फ्रेंच चित्रपटांतील कथानकांवरून एक नाटकही लिहिले. यानंतर महायुध्दाच्या हालचालीचा इतिहास लिहिला. परंतु काही कारणास्तव ते छापून आले नाही. हे झाले माट्यांचे विद्यार्थी अवस्थेतील स्फुट वैचारिक लेखन; याशिवाय त्यांनी कित्येक मासिकांमधून वाङ्मय विषयक, समीक्षात्मक, प्राचीन वाङ्मयासंदर्भात स्फुट वैचारिक लेखन केलेले आहे. परंतु हे सगळे वाङ्मय असंग्रहित आहेत.

## ग्रंथनिर्मिती :

माट्यांनी स्वत:च्या संपादकत्वाखाली काही ग्रंथरचना केल्या आहेत. याचा व्याप खूप मोठा होता. आपल्या संपादकत्वाखाली माट्यांनी "केसरी प्रबोध", "महाराष्ट्र सांवत्सरिक", चिन खंड, "केळकर ग्रंथ", "विज्ञान बोध", "हिंदु-समाज दर्शन" इ. ग्रंथाचे संपादकत्व केले. या सगळ्या ग्रंथाचे लिखाण माट्यांनी सामुदायिक अभ्यासाच्या स्थाने संकलित केले आहे. हे सगळे लिखाण संकलनात्मक असले तरी त्यात माट्यांचेही स्वतंत्र असे बरेचसे लिखाण आलेले आहे.

प्रत्येक ग्रंथाचे लिखाण होत असताना माट्यांची एक विशेष योजना असे. व त्या शिस्तीतच सगळे काम झाले पाहिजे असे त्यांचे प्रामाणिक मत होते. त्यांच्या कार्यात दुसरे कुणी ढवळाढवळ केलेले त्यांना खपत नसे. ते म्हणतात, "एखादी योजना प्रथम चांगल्या चिकित्सेने आणि बारकाईने ठरवावी, पण ती ठरल्यानंतर दरवेळी आणि दर माणसाशी बोलतांना आपण तिचे स्म पालटवूं देऊ नये; आणि असे केले, तरच योजना भराभर निकालांत निघते."[५१] अशाच पध्दतीने त्यांनी पुढील ग्रंथाचे संपादकत्व केले. आपल्या मताशी ते

ठाम असत. कुठल्याही प्रसंगी ते आपले मत बदलीत नसत. माट्यांच्या मते प्रत्येकाची मर्जी सांभाळण्यासाठी त्यांची मते ऐकत बसल्यास आपण पुष्कळदा ... पेचात पडतो. कारण "आयत्या वेळी चर्चेला आलेले लोक नाना प्रकारचे विकल्प सहज सुचवू शकतात. मतभेद आणि विकल्प सुचविणे हा सुशिक्षित मनाचा एक धर्मच बनलेला आहे."[५२] म्हणून शक्यतो आपल्या भूमिकेशी तटस्थ रहावे.

माट्यांनी घालून दिलेल्या शिस्तीतच सगळ्या ग्रंथाचे लेखन झाले. "केसरीप्रबोध" च्या वेळी एकूण ७५,८० लेखकांनी ही शिस्त उत्तम प्रकारे पाळली. कुणीही त्यांचा अवमान केला नाही.

माट्यांच्या संपादनाखाली तयार झालेला दुसरा ग्रंथ म्हणजे "महाराष्ट्र सांवत्सरिक". यात मानवी प्रगतीचे टप्पे दाखविणाऱ्या शेकडो घटनांच्या नोंदी आहेत. शिवाय या ग्रंथात महाराष्ट्रातील सुमारे १०८ जातींच्या रीतिरिवाजांची आणि समजुतींची माहिती करुन देणारे एक मोठे कोष्टक आहे. ज्यांना कुणाला सामाजिक चळवळ करावयाची असेल, त्यांना या माहितीचा उपयोग व्हावा, "म्हणून या ग्रंथाची योजना आखलेली होती. याच ग्रंथाच्या संपादकत्वाने माट्यांना एक कर्ता लेखक म्हणून प्रसिध्दी मिळाली. माटे म्हणतात, "महाराष्ट्राच्या बौध्दिक जीवनात कायमचे स्थान मिळावयास अगदी आरंभी मला या ग्रंथाचा उपयोग झाला."[५३] प्रत्येक काम स्वत:च्या स्वतंत्र बुध्दीने आखून पार पाडावयाची त्यांना भारी हौस होती. स्वत:वर तर त्यांचा जबरदस्त आत्मविश्वास असे. आपण हे करू शकतो तर दुसऱ्यांची मदत का घ्यावी ? हे त्यांच्या स्वयंभू वृत्तीला कधीच पटले नाही. याचा अर्थ ह्या कामासाठी कुणी लायक माणूसच नव्हता असे त्यांचे म्हणणे नाही. दुसऱ्या कुठल्याही क्षेत्रातील विद्वानाबद्दल

त्यांना अभिमान,आदर होता. केतकरांबद्दल म्हणतात, "डॉ. केतकर हे माझ्यापेक्षा जास्त बहुश्रुत जास्त विद्वान हे नि:संशय खरे होते."[५४]

तिसरा ग्रंथ "केळकरग्रंथ" होय. केळकरांच्या साठीच्या समारंभाच्या निमित्ताने हा ग्रंथ निघाला. त्यावेळी केळकरांची लोकप्रियता खूप होती. साठीच्या समारंभाच्या आधीच ८ दिवस ग्रंथाच्या सा-या प्रतींना मागण्या आल्या. माट्यांनीही या ग्रंथात केळकरांविषयी बरेचसे लिहिले आहे.

"हिंदुसमाजदर्शन" नावाचा ४ था ग्रंथ १९३५ साली माट्यांनी लिहिला. हा ग्रंथ त्यांनी स्वत: लिहिला आहे. हिंदुमहासभेच्या अधिवेशनाच्या निमित्ताने हा ग्रंथ निघाला. या पुस्तकांत माट्यांनी प्रत्येक प्रकरणाला स्वतंत्र प्रास्ताविक लिहिले होते. यातील मजकुरामुळेच सरकारने या पुस्तकावर खटला भरला होता. परंतु बॅ.जयकर यांनी या पुस्तकातील प्रस्तावनांचे समर्थन अत्यंत कुशलतेने केल्याने हायकोर्टाने हे पुस्तक मुक्त केले.

यानंतरचा ग्रंथ म्हणजे "विज्ञानबोध" व त्याची प्रस्तावना होय. हा एक कोशासम ग्रंथ आहे. या ग्रंथाला जवळजवळ दोनशे पृष्ठांची एक विस्तृत प्रस्तावना माट्यांनी लिहिली आहे. हा प्रस्तावना खंडच एक स्वतंत्र ग्रंथ होवू शकतो. इतके ते विस्तृत आहे. यांत मानवी सुधारणेच्या व ज्ञानाच्या उगमापासून मानवाने आजपर्यंत जी स्वत:ची प्रगती करून घेतली आहे. तिचा या ग्रंथात आढावा आहे. आणि त्यापासून महाराष्ट्राने काय बोध घ्यावा हे स्पष्ट सांगितले आहे. माट्यांनी या ग्रंथाचे प्रस्तावनाखंड, शास्त्रखंड, चमत्कारखंड व चरित्रखंड असे चार भाग केले आहेत. त्यापैकी चरित्रखंडात आपल्याकडील शास्त्रज्ञांची माहिती दिलेली आहे. दिवसेंदिवस प्रगत

होत जाणा-या स्पर्धेत जर टिकाव धरावयाचा असेल तर, शास्त्रीय ज्ञानाची यापुढे उपेक्षा करुन भागणार नाही असा या ग्रंथात लेखकाने प्रेरणादायी संदेश दिला आहे.

यानंतर "अस्पृष्ठांचा प्रश्न" या ग्रंथात हिंदुसमाजरचनेचा अत्यंत सूक्ष्म वास्तववादी दृष्टिकोनातून आढावा घेतलेला आहे. यात अस्पृश्यतेचा उगम, त्याचे स्वरुप, त्याचा इतिहास, वंशकल्पना, अस्पृश्यता निवारणाचा उपाय. अशा विविध टप्प्यांतून त्यांनी आपला विचार मांडला आहे.

"परशुराम चरित्र" या पुस्तकात हिंदुसमाजरचनेच्या तत्वाची सूक्ष्म चिकित्सा केली आहे. याशिवाय परशुरामाच्या जीवनाचा सामाजिक अर्थ हिंदुसमाजरचनेच्या दृष्टिकोनातून लावून दाखविलेला आहे.

ललित वाङ्मय :

यानंतर माटे कथावाङ्मयाकडे वळलेले दिसतात. वयाची पन्नाशी उलटल्यानंतर माटे या ललित वाङ्मयाच्या दालनात शिरले. एका विद्यार्थी मित्राच्या आग्रहावरुन त्यांनी कथा लिहिण्यास सुरुवात केली. अगदी सुरुवातीलाच त्यांनी म्हटले आहे की, "मला ललित लेखनाचे ज्ञान नाही. आणि गोष्टी लिहिणारे एवढाले लेखक समाजांत आहेत की, आपण तसले साहस करु नये."[५५] अशी त्यांची लघुकथेच्या लिखाणाबद्दल विनयाची वृत्ती होती.

त्यांचे सगळे कथावाङ्मय "उपेक्षितांचे अंतरंग", "भावकथा", "अनामिका","भावनांची मांडवी", "भावनांचे पाझर", "मधूला सांगितलेल्या गोष्टी", "माणुसकीचा गहिवर" इ. कथासंग्रहातून प्रसिध्द झालेले आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्यांच्या कथेत विषयाचे वेगळेपण जाणवते. काही उच्चवर्णीय समाजानी, लेखकांनी ज्या समाजाची उपेक्षाच केली त्या भिल्ल, रामोशी, महार इ. वर्गातील लोकांवरच त्यांनी "उपेक्षितांचे अंतरंगा" तील कथा लिहिल्या आहेत. "कृष्णाकाठचा रामवंशी", "तारळ - खो-यातील पि-या", "सतीचे अस्त्र" "बन्सीधर तूं आता कोठे रे जाशील" १ इ. कथा वाचनीय आहेत.

समाजातील उपेक्षित वर्गासंबंधी प्रा.माटे यांना जे प्रेम, जो जिव्हाळा वाटतो त्या प्रेमामुळेच या पुस्तकांतील लेखन अत्यंत हृदयस्पर्शी उतरले आहे. त्यांच्या कथावाङ्मयात उत्कट संवेदनशिलता, मानव्याची जाण, सूक्ष्म सामाजिक निरीक्षण, आकर्षक कथात्मकता असल्यामुळे त्यांच्या कथा अधिक जिवंत वाटतात.

माटे हे मूळचे ललित लेखक नव्हते. अशा त-हेचे लेखन त्यांनी खूप उशीरा सुरु केले. त्यांच्या स्वभावगत वैशिष्टयांतूनच हे ललित वाङ्मय निर्माण झाले. निव्वळ काही तरी रचून लोकांचे मनोरंजन करावे असले काल्पनिक लेखन त्यांनी केले नाही. त्यांच्या प्रत्येक कथेला सत्यसृष्टीतील घटनेचा आधार आहे. त्यामुळेच त्यांच्या कथा अत्यंत जिवंत, रसाळ, मनोवेधक, हृदयस्पर्शी अशा उतरल्या आहेत. "सावित्री मुक्यानेच मेली" किंवा "कसाचा संसार" हया कथा अत्यंत उत्कृष्ठ आहेत. त्यांचे लेखन सत्याच्या कसोटीला पुरेपूर उतरते यात काही वाद नाही.

समाजातील उपेक्षित वर्गाबद्दल त्यांना खूपच सहानुभूती होती. हया सहानुभूतीतूनच त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. त्यांचे ललितलेखन सुध्दा उपेक्षित वर्गाबद्दल वाटणा-या जिव्हाळ्यातून निर्माण झाले आहे. आपल्याला जसे अस्पृश्यांच्या दु:खाबद्दल वाईट वाटते तसे इतरांनाही वाटावे, त्यांची दु:खे समाजाला समजावीत व त्या वर्गाविषयी आपल्या प्रमाणेच इतरांनाही सहानुभूती प्रेम जिव्हाळा

निर्माण व्हावा म्हणून त्यांनी भिल्ल, रामोशी इ. अस्पृश्य वर्गातील व्यक्तींची चित्रणे व ग्रामीण भागातील व्यक्तींची चित्रणे आपल्या कथेत रेखाटली आहेत. ग्रामीण जीवनातली तर चित्रणे इतकी सुंदर व जिवंत वठली आहेत की अशी चित्रणे मराठी वाङ्मयात क्वचितच आढळून येतील.

त्यांच्या कथेत सौंदर्यदृष्टी, निसर्गप्रेम, मानवी स्वभावातील विसंगती शोधणारी विनोदबुध्दी हे गुणही आढळतात.

माटे म्हणतात की, लघुकथेच्या तंत्राचा आपण अभ्यास केला नाही. परंतु जीवनाचे सखोल अनुभव घेतलेल्या व्यक्तीला व अभिजात रसिकता असलेल्या जातीवंत वाङ्मय लेखकाला कथेचे तंत्र शिकावे लागत नाही. ती त्यांच्या स्वभावात उपजतच असते. माट्यांच्या कथा मूळ सत्यावर आधारलेली असल्याने त्यांच्या कथांनी त्यांचे स्वत:चेच एक वेगळे तंत्र निर्माण केले आहे.

कुठल्याही वाङ्मय तंत्राची मदत न घेता अगदी विशिष्ट हेतू समोर ठेवून किंवा अगदी सहजतेने केलेले लेखन सुध्दा किती सुंदर, किती वेधक होऊ शकते याचे उदाहरण म्हणजे माट्यांचे कथालेखन होय.

माट्यांनी लिहिलेली "पश्चिमेचा वारा" ही कादंबरी मात्र फारशी यशस्वी झालेली दिसून येत नाही. यात मानवी मनातील समाजपरीवर्तनाची प्रमेये सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

स्वतंत्र विचारसरणी, व्याकरणप्रचुर शुध्द भाषाशैली इ. गुणामुळे मराठी साहित्यात माट्यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे. कुठल्याही विषयाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अगदी वेगळाच असतो.

मग तो वाङ्‌मयीन असो, सामाजिक असो किंवा राजकीय असो, त्यांच्या सगळ्या लिखाणात खास "स्वत:ची" अशी माटे शैली दिसून येते. वाचकांवर या माटे शैलीचा ठसा जरूर उमटतो. त्यामुळे त्यांचे लेखन विस्ताराने थोडे असले तरी गुणांनी बहुमोल परिपूर्ण आहे.

माट्यांच्या लेखनाचे विषयही वेगवेगळे आढळतात. ललित व गंभीर अशा दोन्ही स्वरूपाचे लेखन त्यांनी केलेले आहे. त्यांच्या ललित लेखनाने करमणूक होते तर गंभीर स्वरूपाच्या लेखनाने मन विचारी बनते.

खरे तर कुठलाही लेखक हा तरूणवयात ललितवाङ्‌मय लेखनाकडे वळतो. त्या दरम्यान त्याला काव्य, कथा, नाटक, कादंबरी यांचे भलतेच आकर्षण असते. पण माट्यांचे मात्र तसे झाले नाही. त्यांना सुरूवातीपासूनच गंभीर वैचारिक प्रकारच्या लेखनाचे आकर्षण असलेले दिसून येते. तरूण वयात त्यांनी लिहिलेल्या स्फुट लेखनावरूनच त्यांचा कल कुणीकडे होता हे दिसून येते. त्यांचे "काळ" पत्रातील लेखन, महायुध्दाच्या इतिहासाचे लेखन काही टीकालेख यावरून देखील त्यांच्या प्रकृतीची कल्पना येते. यानंतर त्यांनी प्रबंधात्मक व संशोधनात्मक प्रकारचे लेखन केले. पूर्व वयात त्यांनी "केसरी प्रबोध", "केळकर ग्रंथ", "महाराष्ट्र सांवत्सरिक", "विज्ञानबोध" अशा भल्या मोठ्या भारदस्त ग्रंथाचे संपादन केले व स्वत:ही त्याकाळी "अस्पृष्टांचे प्रश्न", "परशुराम चरित्र" या सारख्या सामाजिक प्रश्नांवर आधारित असलेले वैचारिक ग्रंथ लिहिले. आणि पुढे सगळ्यात शेवटी वयाच्या पन्नाशी नंतर "उपेक्षितांचे अंतरंग", "आपापले हितगुज", "रसवंतीची जन्मकथा", "अनामिका", "माणुसकीचा गहिवर", "साहित्यधारा", इ. रसपूर्ण ललित साहित्य निर्माण केले. "पाश्चात्य पुरूषश्रेष्ठ", "विचारशलाका" हे ग्रंथ दोन्ही प्रकारात मोडणारे आहेत.

माट्यांचे समग्र वाङ्•मय पाहिले तर माटे कोणाही व्यक्तीच्या अथवा मतप्रणालीच्या आहारी गेलेले नाहीत• किंवा त्यांच्या कार्यशक्तीवर कुणाचा जबरदस्त प्रभाव पडलेला नाही• केवळ लिहायचे म्हणून त्यांनी लिहिले नाही, तर जे त्यांना आवडलेले आहे, भावलेले आहे, इतरांना काहीतरी सांगायची तळमळ लागून राहिली आहे• त्याचाच अविष्कार त्यांनी वाङ्•मयात केला आहे• आपण स्वत: अनुभवलेले, स्वत:ला जाणवलेले काही प्रामाणिक अनुभव समाजाला सांगून त्यांच्या जीवनात एक नव्या प्रकारचे चैतन्य निर्माण करावे, हीच भूमिका त्यांच्या लेखनातून दिसते• माट्यांनी शेवटपर्यंत "स्वत्व" राखले हाच त्यांच्या व्यक्तित्वाचा विशेष आहे•

त्यांच्या लेखनात काही प्रमाणात किरकोळ दोषही आढळतात• पाल्हाळिकपणा, त्याच त्या कल्पनांची पुनरुक्ती, कलेला उपयुक्त असलेला संयम व सूचकतेचा अभाव• परंतु हे दोष जरी त्यांच्या लेखनात असले तरी तेवढे गुणही त्यांच्या साहित्यात असल्याने त्यांचे लेखन निरस वाटत नाही• माट्यांच्या वाङ्•मयीन कर्तृत्वामुळे मराठी साहित्याचे दालन अधिक सुंदर व समृध्द झाले आहे यात शंका नाही•

00 :*÷*÷÷*÷*÷*÷*÷*÷*÷*÷*: 00

## ** संदर्भ सूची **

१] माटे श्री.म. : "चित्रपट, मी व मला दिसलेले जग"
व्हीनस प्रकाशन, पुणे-२.
पृष्ठ-२३७, २३८

२] तत्रैव, पृष्ठ-२४१

३] तत्रैव, पृष्ठ-२४२

४] तत्रैव, पृष्ठ-२४२, २४३

५] तत्रैव, पृष्ठ-२४३

६] तत्रैव, पृष्ठ-२४३,२४४

७] तत्रैव, पृष्ठ-१६८, १६९

८] तत्रैव, पृष्ठ-२४७

९] तत्रैव, पृष्ठ-२१४

१०] तत्रैव, पृष्ठ-२१४

११] तत्रैव, पृष्ठ-२५३

१२] तत्रैव, पृष्ठ-२५३

१३] तत्रैव, पृष्ठ-२५७

१४] तत्रैव, पृष्ठ-२६१

१५] तत्रैव, पृष्ठ-२६४

१६] तत्रैव, पृष्ठ-२६५

१७] तत्रैव, पृष्ठ-२७३

१८] तत्रैव, पृष्ठ-२८२

१९] तत्रैव, पृष्ठ-२८२

२०] तत्रैव, पृष्ठ-३१२

२१] तत्रैव, पृष्ठ-३१६

२२] तत्रैव, पृष्ठ-३१७, ३१८,३१९,३२०

२३] तत्रैव, पृष्ठ-३२२, ३२३

२४] श्री.म. माटे जन्मशताब्दी विशेषांक : महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक-२३८ जुलै ते सप्टेंबर १९८६ पृष्ठ-९२.

२५] माटे श्रुनि, : पृष्ठ-२९२

२६] तत्रैव, पृष्ठ-२९२

२७] जोशी य.गो. : माटे व्यक्ति आणि वाङ्मय आदर्श मुद्रणालय, ३९५/५ सदाशिव पेठ, पुणे-६, पृष्ठ-१७

२८] माटे श्रुनि, : पृष्ठ-२७७

२९] तत्रैव, पृष्ठ-३००

३०] तत्रैव, पृष्ठ-३००

३१] तत्रैव, पृष्ठ-२९६

३२] तत्रैव, पृष्ठ-२८८

३३] तत्रैव, पृष्ठ-३०१

३४] तत्रैव, पृष्ठ-२९३

३५] तत्रैव, पृष्ठ-२९४

३६] तत्रैव, पृष्ठ-२९५

३७] तत्रैव, पृष्ठ-३०९

३८] तत्रैव, पृष्ठ-३१०

३९] तत्रैव, पृष्ठ-३११

४०] तत्रैव, पृष्ठ-३३१

४१] तत्रैव, पृष्ठ-३२६

४२] तत्रैव, पृष्ठ-३२९

४३] तत्रैव, पृष्ठ-३२९

४४] जोशी श्रुति, : पृष्ठ-७४

४५] माटे श्रुति, : पृष्ठ-२४३

४६] तत्रैव, पृष्ठ-२४६

४७] तत्रैव, पृष्ठ-२५८

४८] जोशी श्रुति, : पृष्ठ-७१

४९] तत्रैव, पृष्ठ-१९

५०] तत्रैव, पृष्ठ-२०, ३५

५१] माटे श्रुति, : पृष्ठ-३४७

५२] तत्रैव, पृष्ठ-३४७

५३] तत्रैव, पृष्ठ-३५३

५४] तत्रैव, पृष्ठ-३५३

५५] तत्रैव, पृष्ठ-३८९

oo *÷*÷*÷*÷* oo